


महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

रविवार, दि. ३० नोव्हेंबर २०२५




मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४ थे | अंक : ०१९ | किंमत : ४.०० रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com




# जिथे जिथे बॉम्बे आहे त्याचं मुंबई करणार : उद्धव ठाकरे

## आम्ही जे मराठी महापौर बसवले ते हिंदू नव्हते का?



**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी शनिवारी चारकोप विधानसभा मतदारसंघाचा दौरा केला. यावेळी त्यांनी कांदिवली पश्चिम विभाग क्रमांक २ येथे कार्यकर्त्यांची भेट घेतली. यानंतर त्यांनी चारकोप येथील मालवणी महोत्सवात सहभाग घेतला. यावेळी बोलताना उद्धव ठाकरे यांना 'बॉम्बे' नावावर भाष्य करताना मोठी घोषणा केली आहे. त्यांनी नेमकं काय म्हटले ते जाणून घेऊयात.

मुंबईची हवा आता घातक होत चालली आहे. मुंबईत प्रदूषण वाढलं आहे. आपले राज्यकर्ते अकलेचे तारे तोडत आहेत. इथिओपियात ज्वालामुखीचा उद्रेक झाला त्यानंतर धुळीचे लोट उडाले त्यामुळे प्रदूषण होतं आहे म्हणत आहेत. पण हे लोट त्याचे नाहीत मागचे दोन ते चार वर्षे मुंबई महापालिकेत जो भ्रष्टाचार झाला, महाराष्ट्रात भ्रष्टाचार झाला आहे त्याचा उद्रेक झाला आहे. मला तुम्हा सगळ्या उपस्थितांचा अभिमान वाटतो. भगवा एकच, शिवाय आता दोन्ही भगवे एकत्र झाले आहेत.

आत्ताच्या राज्यकर्त्यांपैकी एका नेत्याला विचारलं गेलं की मुंबईचा महापौर मराठी होणार का? तो म्हणाला मुंबईचा महापौर हिंदू होणार. मग आजपर्यंत जे काही मराठी महापौर केले ते काही हिंदू नव्हते का? आम्ही अस्सल मराठीप्रेमी हिंदू आहोत. आम्ही दोघं जे काही तुम्हाला सांगत आहोत ते हेच आहे की मुंबईचं मराठीपण हे लोक हळूवारपणे मारत चालले आहेत. आम्ही हिंदू आहोतच पण त्यासाठी आम्ही महाराष्ट्राचा बळी जाऊ देणार नाही. देशाचं रक्षण करणारं जे गाणं आहे ना दिल्लीचं तख्त राखतो महाराष्ट्र माझा. तसा दिल्लीशी एकनिष्ठ असणारा आमचा महाराष्ट्र आहे. हिंदीचा आम्हाला द्वेष नाहीये, पण सक्ती का करता. जिकडे बॉम्बे असेल तिकडे आम्ही मुंबई करू अशी घोषणा यावेळी उद्धव ठाकरे यांनी केली आहे.

उद्धव ठाकरे पुढे म्हणाले, मधे त्यांचे नेते आले होते ते म्हणाले आयआयटी बॉम्बेमधे बॉम्बे आहे तेच बरं आहे. आमच्याकडून ते राहिलं करायचं पण आज तुम्हाला सांगतो जिथे जिथे बॉम्बे असेल तिथे मुंबई करु. कुठल्या शाळेचं नावही बदलायचं तर बदलू. कारण पंतप्रधान जे बोलत आहेत कुठल्यातरी मॅकेलेची शिक्षणपद्धती आहे त्याने गुलामीच्या मानसिकतेत ढकललं. हे मॅकेलेने नाही केलं तुमच्या मुंबईला बॉम्बे म्हणणाऱ्या ज्या नेत्यांच्या अवलादी आहेत त्यांनी हे केलं आहे अशी बोचरी टीका उद्धव ठाकरेंनी केली. याविरोधातच आपल्याला लढा द्यायचा आहे असंही उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे.

### मुंबईकरांच्या प्रेमात कुणी मिठाचा खडा टाकणार असेल तर..: उद्धव ठाकरे

आपल्या भाषणात उद्धव ठाकरे पुढे म्हणाले की, 'मुंबईकरांच्या प्रेमात हे मिठाचा खडा टाकत असतील तर त्यांना बाजूला करण्या शिवाय राहणार नाही. अ मराठी मुस्लिमही म्हणत आहेत की त्यांना मुंबई शिवसेनेच्या ताब्यात हवी आहे. पक्ष चोरू शकतात पण आपले प्रेम चोरू शकत नाहीत. एक मालवणी जत्रोत्सव गिरगावमध्ये केला पाहिजे. कोंबडी वडे गिरगाव चौपाटीवर झाले पाहिजे. कधीही निवडणूक होईल. पंतप्रधान सांगतात ऑन नेशन ऑन इलेक्शन आम्ही सांगतो ऑन नाव ऑन मत.' असंही उद्धव ठाकरेंनी म्हटलं आहे.

## थोडक्यात...



### महायुतीत फोडाफोडी कोण करतंय?

**मुंबई (समर्थ गांवकरी) :** महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य निवडणुकांची रणधुमाळी सुरु आहे. दरम्यान शुक्रवारी रविंद्र चव्हाण यांनी केलेलं वक्तव्यही गाजलं, ते म्हणाले होते मला 2 डिसेंबरपर्यंत युती टिकवायची आहे. महायुतीत ऑल इज नॉट वेल आहे का? असाही प्रश्न समोर आला. दरम्यान महाराष्ट्रात शिवसेना आणि भाजप पक्षात फोडाफोडी सुरु आहे. या फोडाफोडीचा वाद थेट हाणामारीपर्यंत पोहचला आहे. फोडाफोडी कोण करतं आहे? भाजपा शिवसेना वादाबाबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आता उत्तर दिलं आहे.

### अपहारातील आठवा आरोपी अटक

**जालना (समर्थ गांवकरी) :** बनावट दस्तऐवज तसेच शासकीय संगणक प्रणालीचा गैरवापर करून कृषी नुकसानीबद्दल शेतकऱ्यांना देण्यात आलेल्या 24 कोटी 90 लाख रुपये अनुदानाचा अपहार झाल्याच्या संदर्भात दाखल गुन्ह्यात पोलिसांनी आठव्या आरोपीस अटक केली आहे. घनसावंगी तालुक्यातील रांजणीवाडी, भुतेगाव ,कृष्णनगर गावांतील नैसर्गिक आपत्तीमुळे पीकहानीचे पंचनामे करण्यात आले होते. हे पंचनामे करून संबंधित शेतकऱ्यांची यादी संगणक प्रणालीवर 'अपलोड' करण्यात सहभाग आढळून आल्याच्या आरोपावरून कृषी सहाय्यक केशव कचकलवाड यास स्थानिक गुन्हे शाखेने अटक केली आहे.

# आमदाराला ट्युशनसाठी माझ्याकडे पाठवा : आमदार रवी राणा

**अमरावती : (समर्थ गांवकरी)**

"जातीपातीच्या राजकारणामुळे काम करणाऱ्या नवनीत राणांचा पराभव झाला आणि अमरावती जिल्ह्याचे हाल सुरू झाले. सध्याच्या खासदारांचा विकासकामांत काहीच पत्ता नाही. तर दुसरीकडे, विधानसभेत दारूचे दुकान असलेल्या व्यक्तीला तुम्ही निवडून दिले. विकास कसा करायचा हे शिकण्यासाठी त्या आमदाराला माझ्याकडे पाठवा, मी त्यांची ट्यूशन घेतो," अशा शब्दांत आमदार रवी राणा यांनी विरोधकांवर सडकून टीका केली.



राज्यातील नगरपालिका आणि नगरपरिषद निवडणुकीच्या प्रचाराचा आज शेवटचा दिवस आहे. ठिकठिकाणी उमेदवारांच्या सभा, रोड शो आणि प्रचारकार्याला मोठी चालना मिळाली असून सर्वच राजकीय पक्षांचे नेते जनसमुदायाला आकर्षित करण्यासाठी जोरदार रणनीती आखताना दिसत आहेत. त्यातच अमरावतीत युवा स्वाभिमानी पक्षाचे नेते आणि आमदार रवी राणा यांनी एका प्रचार सभेत विरोधकांवर तिखट टीका करत लोकसभा निवडणुकीतील पत्नी नवनीत राणा यांच्या पराभवाबद्दलची खंत उघडपणे व्यक्त केली.

नवनीत राणांचा पराभव झाल्यामुळे अमरावती जिल्ह्याचे काय हाल झाले? हे सर्वांना माहीत आहे. आताच्या खासदाराचा अत्ता, पत्ता नाही. विकासाचा पत्ता नाही आहे, काम करणारी महिला खासदार नवनीत राणा तुमच्या आशीर्वादाने लढत होती. पण जातीपातीच्या राजकारणामुळे तिचा पराभव झाला. विधानसभा निवडणुकीमध्ये आपल्या उमेदवाराचा पराभव झाला आणि दारूचा दुकान असलेला व्यक्ती निवडून आला, अशा शब्दांत रवी राणा यांनी निशाणा साधला. स्थानिक आमदार गजानन लवटे यांच्यावर निशाणा साधताना राणा यांनी खोचक टीका केली.

# "देवेंद्र फडणवीस इतिहासात झाडतोड्या मुख्यमंत्री म्हणून ओळखले जातील",

**अमरावती (समर्थ गांवकरी)**

आगामी कुंभमेळ्यासाठी सरकारने नाशिकमधील १८०० वृक्ष तोडण्याचा निर्णय घेतल्यानंतर त्यावर सर्वच स्तरातून तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. साधुग्रामच्या नावाखाली ही जमीन सपाट करून खासगी उद्योगपतींच्या घशात घालण्याचा सरकारचा डाव असल्याचा आरोप मनसे प्रमुख राज ठाकरे यांच्यासह अनेक नेत्यांनी केला आहे. आता काँग्रेसच्या नेत्या आणि माजी मंत्री यशोमती ठाकूर यांनीही सरकारच्या या निर्णयावर टीका केली आहे.



## आरक्षण मर्यादेने राज्य सरकारची कोंडी!

# राज्य निवडणूक आयोगाची संयमी भूमिका



**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

राज्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाने राज्य सरकारची पूर्ण कोंडी झाली आहे. या निवडणुका ५० टक्के आरक्षणाच्या मर्यादेत घेण्याच्या न्यायालयाच्या आदेशाचा सर्वाधिक फटका विदर्भ आणि मराठवाड्याला बसणार असल्याने ओबीसींच्या नाराजीला सरकारला सामोरे जावे लागणार आहे.

त्यामुळे पुन्हा न्यायालयात जाण्याच्या हालचाली सरकारदरबारी सुरू झाल्या असून, निवडणूक आयोगाने मात्र 'संयमी' भूमिका घेतल्याचे सूत्रांनी सांगितले.

# अयोध्येतील अगस्ती मंदिरातील मूर्ती अकोले आश्रमावरूनच साकार

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

अकोले अयोध्येतील राम मंदिर परिसरातील अगस्ती मंदिरात असलेली अगस्ती ऋषींची मुर्ती ही अकोले येथील अगस्ती आश्रमातील मूर्तीवरून तयार करण्यात आली आहे. काल देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या मूर्तीचे पूजन झाले.त्या घटनेचे छायाचित्र  समाज माध्यमात प्रसिद्ध झाले. ते पाहून अकोलकर सुखावले.

अयोध्या येथील रामजन्मभूमी मंदिर परिसरात अन्य सात मंदिरे असून त्यात एक अगस्ती ऋषींचे मंदिर आहे.

या मंदिरात अगस्ती ऋषींची मुर्ती बसविण्यापूर्वी राम मंदिर न्यासाचे कोषाध्यक्ष गोविंदगिरीजी महाराज यांनी देशात असणाऱ्या अगस्ती ऋषींच्या मंदिरांची माहिती घेतली होती.

मुळ अहिल्यानगर जिल्ह्यातील असल्यामुळे गोविंदगिरीजी यांना अकोले येथील अगस्ती आश्रमाची माहिती आहे.त्यांनी मूर्ती कशी असावी या बाबत  अगस्ती ऋषी अभ्यासक माजी प्राचार्य डॉ.अनिल सहस्त्रबुद्धे यांचेकडे विचारणा केली.

"अगस्त्य महात्म्य"ही पोथी लिहिणारे  डॉ सहस्त्रबुद्धे यांनी लिहिलेल्या "अगस्त्य" या कादंबरीचे प्रकाशन गोविंदगिरीजी महाराज यांच्याच हस्ते झालेले आहे.

या कादंबरीचे इंग्रजी,कन्नड आणि हिंदी भाषेत भाषांतर झालेले आहे. डॉ सहस्त्रबुद्धे यांनी अगस्ती देवस्थानचे अध्यक्ष के डी धुमाळ,दीपक महाराज देशमुख व व्यवस्थापक रामनाथी मुतडक यांचेशी संपर्क साधून अकोले आश्रमातील मूर्तीचे फोटो व माहिती गोविंदगिरीजी यांचेकडे पाठविली.

अगस्ती ऋषींची मूर्ती प्रसन्न भावमुद्रा असणारी तसेच एक हात आशीर्वाद देणारा असावा अशी मूर्ती असावी अशी विनंती डॉ.सहस्त्रबुद्धे यांनी केली होती.या सूचनांप्रमाणे अगस्ती ऋषींची मुर्ती तयार करून घेण्यात आली.



अकोल्याच्या अगस्ती ऋषी आश्रमातील श्री अगस्ती महाराजांची मूर्तीचे छायाचित्र प.पू.गोविंददेव गिरीजी यांचे माध्यमातून श्री क्षेत्र अयोध्या रामजन्मभूमी मंदिर येथे मागविले होते.अयोध्या येथील राममंदिरात बसविण्यासाठी त्यातून मूर्ती तयार करून काल देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या हस्ते त्याचे पूजन झाले.सर्व अकोलेकरांच्या दृष्टीने ही आनंददायी व अभिमानास्पद गोष्ट असल्याचे दीपक महाराज देशमुख यांनी सांगितले.आता देशभर अगस्ती ऋषींची हीच मूर्ती प्रमाण मानली जाईल अशी भावना त्यांनी व्यक्त केली. अगस्ती आश्रमात पूर्वी फक्त तांदळा होता.सुमारे साठ वर्षांपूर्वी सध्याची मूर्ती बसविण्यात आली होती.

ही मूर्ती अकोले आश्रमातील मूर्तीची प्रतिकृती आहे.फक्त किंचितबदल त्यात करण्यात आला आहे.अकोले येथील मूर्तीच्या उजव्या हातात रुद्राक्षाची जपमाळ असून डाव्या हातात कमंडलु आहे. अयोध्या येथील मूर्तीचा उजवा हात आशीर्वाद देणारा असून डाव्या हातात कमंडलु बरोबरच डाव्या काखेत कुबडी आहे.बाकी सर्व मूर्ती ही अकोले येथील मूर्तीचीच प्रतिकृती आहे.

# मलाच संपवण्याचा डाव

## नगरपरिषद निवडणूक माझ्यासाठी महत्त्वाची, गडबड करु नका - धनंजय मुंडे

**परळी : (समर्थ गांवकरी)**

"विरोधक आता केवळ माझे राजकारणच नाही, तर मलाच संपवण्याच्या मागे लागले आहेत. मी काम करण्याच्या लायकच राहिलो नाही, तर तुमचे काम कोण करणार? अशा कठीण प्रसंगी तुम्ही माझी साथ देणार की हात सोडणार?" असा थेट सवाल करत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते आणि आमदार धनंजय मुंडे यांनी परळीकरांना अत्यंत भावनिक साद घातली आहे. परळी नगर परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बरकतनगर येथे आयोजित प्रचार सभेत ते बोलत होते.



विधानसभा निवडणुकीसारखेच वातावरण सध्या परळीत असल्याचे सांगत मुंडे यांनी विरोधकांवर निशाणा साधला. "ज्या लोकांनी परळीला जाणीवपूर्वक बदनाम केले, त्या लोकांना चोख उत्तर देण्यासाठी ही निवडणूक महत्त्वाची आहे. मी तुमचे प्रत्येक कर्तव्य पार पाडले आहे, तुमच्या अडचणी सोडवल्या आहेत. माझ्या दारात आलेला माणूस कधीच रिकाम्या हाताने परत गेला नाही. त्यामुळे आपले मत वाया जाऊ देऊ नका आणि कोणतीही गडबड करू नका," अशी विनंती त्यांनी हात जोडून मतदारांना केली.

मतदारांशी संवाद साधताना धनंजय मुंडे प्रचंड भावूक झाल्याचे पाहायला मिळाले. ते म्हणाले, "तुमच्या मनात माझ्याबद्दल असलेले प्रेम हीच माझी खरी ताकद आहे. तुम्ही मला प्रत्येक संकटाच्या काळात साथ दिली आहे. हे उपकार मी कधीच विसरू शकत नाही. माझ्या अंगाच्या कातड्याचे जोडे करून जरी तुम्हाला घातले, तरी मी तुमचे उपकार फेडू शकणार नाही." हे सर्व उमेदवार निवडून आले तरच माझी ताकद वाढेल, असेही त्यांनी नमूद केले.

यावेळी बोलताना धनंजय मुंडे परळी शहराच्या विकासाचा आराखडाही मांडला. नगरपरिषदेच्या माध्यमातून शहरात आयटीआय सुरू करण्याचा मानस असून त्यामुळे रोजगाराला चालना मिळेल, असे त्यांनी सांगितले. तसेच, अतिक्रमण नियमित करून घरकुले देण्याचे काम आपण केले असून, अल्पसंख्याक मंत्रालय आपल्याकडे असल्याने परळीच्या विकासासाठी मोठा निधी आणता येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. लोकसभेला कोणाला किती मते मिळाली यावर न बोलता, रेल्वेमध्ये येथील जागा जाऊ दिली नाही, याची आठवणही त्यांनी करून दिली.



# जिल्हा परिषद शाळा काष्टी येथे उबदार ब्लँकेटचे वाटप

**खर्डी : (समर्थ गांवकरी)**



शुक्रवार दिनांक 28 नोव्हेंबर 2025 रोजी खर्डी येथील "स्वर्गीय शाम बाबा परदेशी" यांच्या "द्वितीय पुण्यस्मरण दिनानिमित्त" दळखण येथील जिल्हा परिषद शाळा काष्टी येथील सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या कुटुंबियांकडून उबदार ब्लँकेटचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाच्या सुरवातीला शाळेतील विद्यार्थ्यांनी आलेल्या कुटुंबीयांचे औक्षण करून ढोलताशांच्या गजरात स्वागत केले तसेच स्वागतगीत, साक्षरतागीत तसेच देशभक्तीपर गीत गाऊन स्वर्गीय शाम बाबांच्या प्रतिमेला आदरांजली वाहिली.

शाळेचे मुख्याध्यापक सचिन सारंगधर सर यांनी स्वर्गीय शाम बाबा यांच्याकडून खर्डी गाव व परिसरात त्यांच्याकडून झालेल्या समाजसेवेच्या स्मृतींना उजाळा दिला. कार्यक्रमासाठी उपस्थित मान्यवर लोकशाहीर अण्णाभाऊ साठे राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त दिलीप अधिकारी यांनीही शाम बाबांच्या गतस्मृतींना उजाळा दिला तसेच उपस्थित विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्व पटवून दिले.

कुटुंबियांकडून सर्व विद्यार्थ्यांना ब्लँकेट तसेच अल्पोपहार यांचे वाटप करण्यात आले. शाळेतील विद्यार्थ्यांनीही आपल्या मनोगतातून मान्यवरांचे आभार मानले.

सदर कार्यक्रम प्रसंगी आदिवासी सेवक दिलीप अधिकारी, स्वर्गीय शाम बाबा यांची पत्नी श्रीमती प्रियाताई परदेशी,त्यांच्या सर्व मुली,जावई आणि नातवंडे आणि कुटुंबीय इत्यादी मान्यवर उपस्थित होते. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेचे मुख्याध्यापक सचिन सारंगधर यांनी केले.



**हिमायतनगर :** हिमायतनगर नगरपंचायतच्या भाजपच्या नगराध्यक्ष पदासाठी डॉक्टर राजेंद्र वानखेडे यांच्या प्रचारार्थ अशोकराव चव्हाण यांची जाहीर सभा न झाली या सभेच्या ठिकाणी अनेक मुद्द्यावर विकासाच्या दृष्टिकोनात हिमायतनगर पाठीमागे असल्याचे सांगितले आणि या राज्यात देवेंद्र भाऊ ची सत्ता आहे आणि सत्ता असल्यामुळे आम्ही सर्वतोपरी विकास करू इथलं नगरसेवक आणि नगराध्यक्ष भाजपचाच पाहिजे आणि देणारा आपला आहे त्यामुळे आपल्याला कुठल्याही गोष्टीची कमतरता पडणार नाही . आणि भरून निधी आणून विकास होईल असे उद्गार अशोक चव्हाण यांनी सभेमध्ये बोलताना सांगीतले.

## थोडक्यात बातम्या...



### अकोले–नारायणपूर दिंडी सोहळ्यात वारकरी बांधवांना चटई वाटप!

- महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व दैनिक समर्थ गांवकरीतर्फे उपक्रम!

अकोले (स. गांवकरी) : अगस्ती ऋषी मंदिर ते नारायणपूर या पारंपरिक पायी दिंडी सोहळ्याचे यंदाचे १३ वे वर्ष मोठ्या उत्साहात साजरे होत आहे. या सोहळ्यात सहभागी झालेल्या वारकरी बांधवांच्या सेवेसाठी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ आणि दैनिक समर्थ गांवकरी समूह यांच्यावतीने लहीत येथे विशेष उपक्रम राबविण्यात आला. या ठिकाणी जवळपास ५०० वारकरी बांधवांना चटई प्रदान करण्यात आली. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या हस्ते हे वितरण करण्यात आले. दिंडी सोहळ्याचे आयोजक राहुल हासे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका सरचिटणीस हरिभाऊ फापाळे, सामाजिक कार्यकर्ते किरण चौधरी, रामनाथ चौधरी आदी मान्यवर उपस्थित होते. वारकरी बांधवांच्या सोयीसाठी करण्यात आलेल्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. चटई वितरणाने वारकऱ्यांच्या प्रवासातील श्रम कमी होतील आणि त्यांच्या विश्रांतीसाठी मोठी मदत होईल, असे मत या वेळी व्यक्त करण्यात आले.

### आगर खोरे महाबरेवाडी मार्गे मातीचे डंपर अंधारात वाहतूक मोठ्या प्रमाणात

शिवनेरी (स. गांवकरी) : आगर खोरे महाबरेवाडी मार्गे मातीचे डंपर अंधारात रात्रीच्या वेळी वाहतूक मोठ्या प्रमाणात सुरू आहे . याबाबत संबंधित जुन्नर पोलीस स्टेशन व तहसील कार्यालय महसूल विभाग याबाबत कठोर काय निर्णय घेणार याकडे तालुक्याचे लक्ष लागलेले आहे. सनाचा अधिकारी पाठीशी असल्यामुळेच अंधाराचा फायदा घेऊन माती महाबरेवाडी मार्गे मोठ्या प्रमाणात वाहतूक सुरू आहे का?. किंवा शासनाच्या नजरेआड वाहतूक सुरू आहे का ?अशी चर्चा तालुक्यात सुरू आहे. सर्वसामान्य शेतकरी बांधवांना माती पाहिजे असेल तर तहसील कार्यालय महसूल विभाग नियमाच्या अटी हा डोंगर उभा करत आहे. त्यामुळे शेतकरी दुखावला आहे. रात्रीच्या अंधारात माती वाहतूक करण्यापेक्षा दिवसा वाहतूक व्हावी अशी नागरिकांमध्ये चर्चा सुरू आहे .माती वाहतूक माती करणारे यांनी दिवसा वाहतूक का करत नाही ?. तहसीलदार डॉ. सुनील शेळके काय निर्णय घेतात याकडे तालुक्याचे लक्ष लागलेले आहे. या मार्गे सातत्याने वाळू व माती रात्रीच्या वेळेस सातत्याने डंपर वाहतूक मोठ्या प्रमाणात सुरू आहे . या मार्गावरून मोठ्या प्रमाणात वाहतूक पुढे कुठे जाते याकडे चर्चेला उधाण सुरू आहे.

### बजरंगनगर येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन



पारनेर (स. गांवकरी) : निघोज परिसरातील बजरंगनगर येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार दि.२९ रोजी पोपट महाराज देशपांडे यांच्या हस्ते विणापूजन करुन अखंड हरिनाम सप्ताहाची सुरूवात करण्यात आली. दगडू महाराज वेताळ, रामदास महाराज दुसाणे, चंद्रकांत पाटील बेळगावकर, शिवाजी महाराज लामखडे यांच्या आशीर्वादाने गेली २२ वर्षांपूर्वी या अखंड हरिनाम सप्ताहाची सुरूवात करण्यात आली होती. चंद्रकांत पाटील बेळगावकर, प्रविण महाराज गोसावी, डॉ. रविदास महाराज शिरसाठ, श्रावण महाराज आहिरे एकनाथ महाराज चत्तर यांचे किर्तन होणार आहेत. बुधवार दि.३ रोजी सकाळी नऊ ते अकरा यावेळी एकनाथ महाराज चत्तर यांच्या काल्याच्या किर्तनाने या सप्ताहाची सांगता होणार आहे. श्रीमती रखमाबाई पांडुरंग वरखडे यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रत्येक दिवशी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.मोहन महाराज घुले, तुकाराम महाराज कुरकुटे, साईनाथ महाराज काळे, अनिल महाराज रुपावते, तुषार महाराज गुंड, तुषार महाराज लाळगे तसेच आळंदी येथील विद्यार्थी यामध्ये सहभागी होणार आहेत. जागराच्या कार्यक्रमात रोकडेश्वर प्रासादिक भजनी मंडळ पिंपरी जलसेन, अंबिका भजनी मंडळ देवीभोयरे, श्रीराम भजनी मंडळ निघोज, कन्हैया भजनी मंडळ निघोज सहभागी होणार आहेत. निघोज - अळकुटी जिल्हा परिषद गटाचे सर्वेसर्वा सचिन पाटील वराळ, राळेगण थेरपाळचे लोकनियुक्त सरपंच पंकजदादा कारखिले, उपसरपंच ज्ञानेश्वर उर्फ माऊलीशेठ वरखडे यांचे विशेष सहकार्य मिळाले आहे. लोकसहभागातून ग्रामस्थ व भावीक यांनी मोठ्या प्रमाणात सहकार्य केले आहे. लामखडे - वरखडे परिसरातील भावीकांनी गेली बावीस वर्षांपूर्वी या ठिकाणी जय हनुमान मंदीर उभे करुन सप्ताह सुरू केला आहे. साधारण शंभर पेक्षा जास्त कुटुंब या ठिकाणी एकसंध होऊन धार्मिक संस्कृती वाढविण्यासाठी प्रयत्न करीत असतात. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा या ठिकाणी असून बहुसंख्य विद्यार्थी आहेत. धार्मिक व शैक्षणिक संस्कृतीला पाठबळ देण्याचे काम ग्रामस्थ करीत असून या अखंड हरिनाम सप्ताहात नामवंत किर्तनकारांचे किर्तने एकण्याचे भाग्य उपस्थित भावीकांना लाभत आहे.

# कर्नाटकातील रामतीर्थ येथे भागवत कथा सप्ताह सोहळा भव्य उत्साहात संपन्न!

- नानजीभाई ठक्कर व डॉ. विश्वासराव आरोटे यांचे पुष्पवृष्टीने दणदणीत स्वागत
- वारकरी संप्रदाय, दानधर्म, सामाजिक एकोप्याचा आदर्श संदेश!

**बिदर/जिल्हा : (समर्थ गांवकरी)**



कर्नाटक राज्यातील भालकी तालुक्यातील रामतीर्थ-वाडी येथे आयोजित सात दिवसीय भागवत कथा सप्ताह सोहळा भक्तिमय वातावरणात, मोठ्या उत्साहात आणि समाजाच्या एकोप्याच्या भावनेने संपन्न झाला. महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवरील या गावात हजारो भाविकांनी उपस्थित राहून भक्तिरसाने न्हाऊन निघाले. या सोहळ्याची खास वैशिष्ट्ये म्हणजे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाचे दर्शन, वारकरी संप्रदायाची परंपरा आणि सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या मान्यवरांचे आगमन.

या प्रसंगी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश महासचिव व दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे तसेच ज्येष्ठ समाजसेवक नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला यांचे ग्रामस्थांनी पुष्पवृष्टी करून आणि घोषणाबाजी करत अतिशय भव्य स्वागत केले. गावाच्या सर्व बाजूंनी निघालेल्या मिरवणुकीने संपूर्ण परिसरात धार्मिक व सांस्कृतिक रंग भरले.

भागवत कथा – ज्ञान, संस्कार व भक्तीचा सोहळा : भागवताचार्य वैभव महाराज जगताप (जालना) यांनी आपल्या दिव्य, मधुर आणि तल्लख वाणीतून भागवत कथेतील सातही दिवस प्रबोधन केले. कथा ऐकण्यासाठी महिला, ज्येष्ठ नागरिक, युवक, शेतकरी, व्यापारी तसेच पंचक्रोशीतील भाविक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

भागवत महात्म्य:





कृष्ण-उद्धव संवाद.
भक्त प्रल्हाद चरित्र.
गोपी-रस.
भक्तीयोग.

या प्रमुख विषयांवर त्यांनी आजच्या जीवनातील उदाहरणांसहित सुंदर सादरीकरण केले.

गावातील सर्व वयोगटातील लोक सात दिवस मुक्तपणे सहभागी झाले. विशेष म्हणजे सात दिवस महिला मांडवात सकाळपासून उपस्थित राहून भागवत कथेतील प्रत्येक दिवसाचे उपदेश अनुकरणीय रीतीने आत्मसात करत होत्या.

दानधर्म हीच वारकरी संस्कृती – डॉ. विश्वासराव आरोटे

कार्यक्रमात बोलताना डॉ. विश्वासराव आरोटे म्हणाले – “आपण आयुष्यात जे काही कमावतो, त्यातील काही हिस्सा समाजासाठी, वारकरी संप्रदायासाठी, ज्ञानमंदिरासाठी वापरणे हे आपले कर्तव्य आहे. दानधर्म केल्याने सत्कर्म घडते, मन शुद्ध होते आणि समाजात सकारात्मक बदल घडतो.”

ते पुढे म्हणाले, “वारकरी संप्रदायाची परंपरा केवळ महाराष्ट्रापुरती नसून कर्नाटकातील अनेक गावांमध्येही रुजलेली आहे. इथले वारकरी आळंदी, पंढरपूर, तुळजापूर येथे पायी दिंडीने जातात, हे महाराष्ट्राच्या संस्कृतीचे मोठेपण आहे.”



नानजीभाई ठक्कर यांचे प्रेरणादायी मनोगत – “मंदिर व समाजकार्य हीच माझी पूजा”

कार्यक्रमात उपस्थित राहून नानजीभाई ठक्कर यांनी गावाला एकत्र आणणाऱ्या या धार्मिक उपक्रमाचे भरभरून कौतुक केले.

ते म्हणाले – “या भागातील संस्कृती, एकोप्याची भावना आणि वारकरी परंपरेचे जतन पाहून मन प्रसन्न होते. गावातील मुलं नोकरी, व्यवसायासाठी बाहेर गेली तरी गावाचा विसर नाही. हा गाव आदर्श आहे.”

कृष्णाजी बिरादार यांनी गावातील मंदिर विकासासाठी सहकार्याचे आवाहन करताच नानजीभाई ठक्कर यांनी त्वरित प्रतिसाद देत आश्वासन दिले –

“गावातील मंदिरासाठी जे काही गरजेचे असेल, ते मी नक्की करत राहीन. मला काय मिळेल यापेक्षा माझ्या गावाला काय देता येईल, हाच माझा संस्कार आहे.”

“जो जीतेगा वही सिकंदर बनेगा” – ठक्कर यांचा युवकांना संदेश!

शेवटी नानजीभाई ठक्कर यांनी युवकांना प्रेरणा देत सांगितले – “परिश्रम व प्रामाणिकपणाने काम केले तर यश नक्की मिळते. जो जिंकतो, जो प्रयत्न करतो, संघर्ष करतो... तोच खरा ‘सिकंदर’ बनतो. समाजासाठी काम करा, तर यश तुमचेच आहे.”

कर्नाटकातील पत्रकार किरण बिरादार यांची महत्त्वपूर्ण नियुक्ती!

या सोहळ्यात आणखी एक महत्वाचा क्षण होता.

कर्नाटक जिल्ह्यात पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत असलेल्या किरण बिरादार यांची महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या कर्नाटक प्रदेशाध्यक्ष पदावर अधिकृत नियुक्ती करण्यात आली. नियुक्तीपत्र देताना नानजीभाई ठक्कर म्हणाले –

“पत्रकारिता ही केवळ नोकरी नाही, ती समाजाला देणारी दिशा आहे. हा वारसा किरण बिरादार निश्चितच पुढे नेतील.”

संजय फुलसुंदर, मुकेश हवालदार, पवन लंगोटे, नवनाथ लंगोटे, सतीश बिरादार, विनोद जाधव, महादेव जाधव, रघुनाथ लंगोटे, तानाजी बिरादार यांच्यासह पंचक्रोशीतील असंख्य भाविकांची उपस्थिती उल्लेखनीय होती.

### कार्यक्रम वैशिष्ट्ये

व्यासपीठावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या अप्रतिम मूर्तीने उपस्थितांचे लक्ष वेधले. दत्तगुरू महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पारंपरिक पद्धतीने कथा प्रारंभ. महाआरतीचा मान नवनाथ लंगोटे, सरोजनाताई बिरादार, तानाजी बिरादार, सुशांत बिरादार, मंगलाताई बिरादार यांना मिळाला. माऊली महाराज कदम व गजानन महाराज नांदेडकर यांचे विशेष मार्गदर्शन. कृष्णाजी दिगंबरराव बिरादार व सरोजनाताई बिरादार यांनी संपूर्ण आयोजनाची जबाबदारी यशस्वीरीत्या पार पाडली.

# पालिका मतदानासाठी या तीन प्रभागात असतील चार मतदान केंद्रे

**राहुरी : (समर्थ गांवकरी)**





राहुरी नगरपालिकेच्या दोन डिसेंबरला होणाऱ्या मतदान प्रक्रियेसाठी 38 मतदान केंद्रे असून तीन प्रभागात एकाच ठिकाणी चार मतदान केंद्रे असून निवडणूक शांततेत पार पाडण्यासाठी निवडणूक आयोगाचा निवडणूक विभाग अलर्ट मोडवर आल्याचे दिसून येत आहे . राहुरी नगरपालिकेच्या नगराध्यक्ष पदासाठी एक तर बारा प्रभागात 24 नगरसेवक पदासाठी दोन डिसेंबर रोजी मतदान प्रक्रिया पार पाडली जाणार आहे . यासाठी 12 प्रभागांमध्ये मतदार संख्येनुसार 38 मतदान केंद्रे असून प्रभाग क्रमांक 9 , 11 व 12 मध्ये प्रत्येकी चार मतदान केंद्रे असतील तर प्रभाग क्रमांक आठ मध्ये दोन मतदान केंद्र असतील . अन्य सर्व प्रभागात प्रत्येकी तीन मतदान केंद्र असतील .

राहुरी नगरपालिका हद्दीतील प्रभाग निहाय मतदान केंद्रे अशी - प्रभाग क्रमांक एक - नूतन मराठी शाळा क्रमांक सात ( दोन केंद्रे ), क्रमांक आठ (एक केंद्र ) प्रभाग क्रमांक दोन - भागीरथीबाई तनपुरे कन्या विद्यालय (दोन केंद्रे ) जिम्नेशियम हॉल (अहिल्या भवन )- (एक केंद्र) प्रभाग क्रमांक तीन - शाहू मंगल कार्यालय ( एक केंद्र ) नूतन मराठी शाळा नंबर चार ( दोन केंद्रे ) प्रभाग क्रमांक चार - भागीरथीबाई तनपुरे प्राथमिक शाळा ( तीन केंद्रे ) प्रभाग क्रमांक पाच - भागीरथीबाई प्राथमिक शाळा ( एक केंद्र ), विद्यामंदिर प्रशाला ( दोन केंद्रे ) , प्रभाग क्रमांक सहा - प्रगती विद्यालय ( तीन केंद्रे ) प्रभाग क्रमांक सात - नूतन मराठी शाळा नंबर 1 ( 3 केंद्रे )

प्रभाग क्रमांक आठ - गाडगे आश्रम शाळा ( दोन केंद्रे)

प्रभाग क्रमांक नऊ - गाडगे आश्रम शाळा ( एक केंद्र ) , नूतन मराठी शाळा नंबर 2 व नंबर 11 ( 3 केंद्रे )

प्रभाग क्रमांक दहा - नूतन मराठी शाळा नंबर सहा व दहा ( दोन केंद्रे ) , गाडगे आश्रम शाळा ( एक केंद्र )

प्रभाग क्रमांक 11 - नूतन मराठी शाळा नंबर 9 ( दोन केंद्रे ) , केशर रंग मंगल कार्यालय ( दोन केंद्रे )

तर प्रभाग क्रमांक बारा करिता शहरातील विद्यामंदिर प्रशाला - ( चार केंद्रे ) असतील .

# अजितदादा या शहराचा चेहरामोहरा बदलून टाकतील

**जामखेड तालुका (समर्थ गांवकरी)**

भाजप व राष्ट्रवादीच्या दोन्ही आमदारांची दोन टर्म झाली आहे पण शहराला आठ दिवसाआड पाणी, रस्त्याचे अर्धवट कामे व धुळीने माखलेले शहर, औद्योगिक वसाहतीला खोडा व श्रेयवादाची लढाई करायची अशी परस्थिती असताना निवडणूक आली की दोन्ही आमदार तळ ठोकून बसतात व विकासाच्या गप्पा मारतात राष्ट्रवादी काँग्रेसच्या सर्वसामान्य कुटुंबातील उमेदवारांना विजयी करून त्या दोघांना धडा शिकवा असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार) स्टार प्रचारक सुनिल आण्णा शेळके यांनी नगरपरिषद निवडणुकीच्या शुक्रवारी झालेल्या जाहीर सभेत केले.जामखेड नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस उमेदवारांच्या प्रचारार्थ झालेल्या जाहीर सभेत स्टार प्रचारक सुनिल आण्णा शेळके बोलत होते.

# ठाण्यात अखंड हरीनाम सप्ताह सोहळा उत्साहात

## डॉ. नानजीभाई ठक्कर यांची विशेष उपस्थिती!

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

ठाण्यातील श्री विठ्ठल मंदिर, बाजारपेठ स्टेशन रोड येथे आयोजित अखंड हरीनाम सप्ताह ज्ञानेश्वरी – गीता पारायण सोहळा भक्तीभावात सुरू असून या सोहळ्याला एनकेटी ग्रुपचे मॅनेजिंग ट्रस्टी डॉ. श्री. नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठानावाला यांनी विशेष उपस्थिती दर्शविली.

या प्रसंगी संस्थापक श्री रमेश तुकाराम सागवेकर, आचार्य श्री विश्वनाथ जोशी, श्री रामराव पाटील, श्री निखिल सतीश बुजवडे, श्री तानाजी सातव, श्री पांडुरंग शिंदे, श्री राजेंद्र पुराणिक, श्री राजेंद्र पांडेजी आणि मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. भक्तांनी डॉ. नानजीभाई यांचे उत्स्फूर्त स्वागत करून सन्मान केला.

नानजीभाई ठक्कर यांचे प्रेरणादायी विचार: भाविकांना संबोधित करताना डॉ. नानजीभाई म्हणाले – “खरा भक्त हा व्यसनमुक्त असतो.

नवनिर्माणासाठी आणि संस्कारांसाठी प्रत्येक भक्ताने पुढील पिढीला व्यसनमुक्तीचा संदेश देणे गरजेचे आहे.”

तसेच त्यांनी मातृशक्तीचा गौरव करत सांगितले की – “स्त्री ही मातृदेवी आहे. तिचा सन्मान केला तरच समाज उज्ज्वल दिशेने वाटचाल करतो.”



पारायण सप्ताह २५ नोव्हेंबर ते २ डिसेंबर : श्रीमद भागवत गीता प्रसारक मंडळ, ठाणे यांच्या वतीने या आठ दिवसीय हरीनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून २ डिसेंबर रोजी सोहळ्याची सांगता होणार आहे. संपूर्ण आठवडाभर भक्तांचा मोठा सहभाग दिसून येत आहे.


आनंदी येथे २३१ फूट उंच भव्य ‘ज्ञानेश्वरी मंदिर’ उभारणी : आनंदी येथील इंद्रायणी नदीकिनारी उभारण्यात आलेल्या २३१ फूट उंच भव्य ज्ञानेश्वरी मंदिराचे बांधकाम पूर्ण झाले असून स्थानिक जमीनमालक काशिमा खिमजीभाई ठक्कर यांचे या मंदिराच्या उभारणीत मोलाचे योगदान आहे.

गेल्या २४ वर्षांपासून येथे प्रसाद परंपरा सुरू असून डॉ. नानजीभाई ठक्कर यांची विशेष उपस्थिती नेहमीच असते. सर्व भाविकांनी येथे दर्शन व प्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले.


सामाजिक कार्यातही अग्रेसर : संस्थेच्या वतीने बायपास, अँजिओग्राफी आणि किडनी ट्रान्सफर अशा जिवावर उदार होऊन केले जाणाऱ्या सेवा उपक्रमांचा लाभ अनेक रुग्णांना मिळत आहे.

# बिलोली नगरपरिषद नगरसेवकपदासाठी अदमनकर यांचा डोर टू डोर प्रचाराच

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**



बिलोली नगर परिषद निवडणुकीच्या अनुषंगाने प्रभाग क्रं. ६ (अ) भास्करनगर मधून शिवसेना उद्धव ठाकरे पक्ष नगरसेवकपदाचे उमेदवार सुदर्शन गंगाराम अदमनकर यांच्या प्रचार रॅलीचे शुभारंभ छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून डोर टू डोर प्रचार करीत आहेत. नगरपालिका स्वयंनिधी अंतर्गत व लहान रस्ते बांधकामाची कामे हाती घेत या कामांना विशिष्ट योजना व सतत विजेचा होणारा लपंडाव नगरपालिकेसाठी थेट 'मोफत वीज' योजना नसली तरी, नगरपालिका क्षेत्रातील नागरिकांसाठी सौर ऊर्जा आधारित योजना उपलब्ध आहेत ज्यामुळे त्यांना वीज बिल कमी किंवा मोफत होऊ शकते. ग्रामीण भागातील बेघर आणि कच्च्या घरात राहणाऱ्या पात्र कुटुंबांना स्वतःचे हक्काचे घर मिळावे यासाठी गायरान जमिनींचा वापर करणे. नवीन धोरण महाराष्ट्र शासनाने ग्रामविकास विभागामार्फत गायरान (गुरचरण) जमीन आणि गावठाणावरील शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे, पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागते, कोणी आजारी पडल्यास रुगणवाहीका आपल्या घरापर्यंत येत नाही किंवा कुणाचे मृत्यू झाल्यास नगरपालिकेचे स्वर्गरथसुद्धा आपल्या वार्डात येत नाही व आपल्याला मृतदेहास खांद्यावर/हातावर मुख्यरस्त्यापर्यंत आणावे लागते आणी नंतर त्याची अंतयात्रा काढली जाते अश्या आपल्या अनेक मूलभूत गरजासुद्धा संविधानिकरित्या आजतगायत दूर करण्यात आल्या नाहीत. वार्डातील सर्व समस्या दूर करीन असे मी आपणास आश्वासन देतो असे नगरसेवकपदाचे उमेदवार सुदर्शन अदमनकर यांनी आश्वासन आपल्या वचननाम्यात दिले. यावेळी देगलूर बिलोली उबाठा पक्षाचे विधानसभा समन्वयक विपुलभाऊ पटने, उबाठा जिल्हाउपाध्यक्ष अल्पसंख्यांक जावेदभाई,सना शेख, लक्ष्मीबाई अदमनकर, नरसूबाई वानकर, लक्ष्मीबाई मोरे, गंगाबाई खरखाडे, सायलू करोड, रामचंद्र अदमनकर, तिरुपती अदमनकर, गणेश अदमनकर, साईनाथ अदमनकर, वैजनाथ अदमनकर, बस्वराज वानकरसह शेकडो महिलांचाही त्यामध्ये समावेश होता.



**संगमनेर खुर्द :** दिवसेंनदिवस बिबट्याची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली असून दिवसाही बिबट दिसत असल्याने ग्रामीण भागातील शेतकरी. शेतात काम करणाऱ्या महिला.. शाळेत जाणारे लहान लहान विद्यार्थी याच्या मध्ये प्रचंड भीतीचे वातावरण दिसून येत आहे. तसेच शेतकऱ्याच्या पशुधनावर सुद्धा बिबटे मोठ्या प्रमाणात हल्ले करत आहेत.

## थोडक्यात बातम्या...




### श्री दत्त जयंती श्रीक्षेत्र नारायणपूरसाठी संगमनेर डेपोद्वारे गाव तेथे एसटी सेवा !

संगमनेर खुर्द (स. गांवकरी) : परमपूज्य श्री श्री श्री नारायण महाराज (अण्णा )यांचे आशीर्वादाने व परमपूज्य श्री टेंबे स्वामी यांचे अधिपत्याखाली श्री क्षेत्र नारायणपूर येथे भव्य दिव्य दत्त जयंती दिनांक 2 व 3 डिसेंबर 2025 पर्यंत संपन्न होणार आहे तरी जास्तीत जास्त भाविकांनी संगमनेर डेपोद्वारे आयोजित 'गाव तेथे एसटी सेवा" या योजनेचा सर्वांनी लाभ घ्यावा अशी विनंती करण्यात येत आहे. दिनांक 27/11/ 2025 रोजी पायी मोफत दिंडी सोहळा श्रीक्षेत्र नारायणपूर कडे अगोदरच प्रस्थान झाला आहे. त्या पाठोपाठ दिनांक 1/12/ 2025 रोजी जवळेकडलग येथून श्री. ज्ञानदेव माऊली देशमुख यांचे घरापासून भव्य दिव्य पायी ज्योतीचे आयोजन तरुणांद्वारे करण्यात आलेले आहे .त्यानंतर राहिलेल्या भाविकांसाठी संगमनेर डेपोद्वारे ,"गाव तेथे एसटी" याप्रमाणे प्रत्येक गावागावातून ग्रुप करून साधारणतः 35 ते 40 सीट झाल्यानंतर बसेस ची सुविधा करण्यात आलेली आहे. तरी भाविकांनी जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचून आपली सेवा श्री दत्त महाराजांच्या चरणी रुजू करावी अशी विनंती करण्यात येत आहे . सर्वांनीपरमपूज्य सद्गुरु टेंबे स्वामींचे प्रवचन व दर्शन घ्यावे व या दत्त जयंतीचा सोहळा याची देही याची डोळा बघून कृतकृत्य व्हावे असे नम्र आवाहन दत्त सेवेकरी सिन्नर, संगमनेर, अकोले विभागातील सर्व दत्त सेवेकरी शिष्यमंडळ करीत आहे.

### नगर शहरातून रस्ता वाहतूक सुरक्षा रॅलीला विद्यार्थ्यांचा उस्फूर्त प्रतिसाद

- सुरक्षित जीवन जगण्यासाठी वाहतुकीचे नियमांचे पालन करणे आवश्यक : सॅम्युअल गायकवाड

अहिल्यानगर (स. गांवकरी) : रस्ता वाहतूक सुरक्षा रॅलीसाठी जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे,अप्पर पोलीस अधिक्षक वैभव कलबुर्मे, उपविभागीय अधिकारी दिलीप टिपरसे,शहर वाहतूक शाखेचे पोलिस निरीक्षक बाबासाहेब बोरसे यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले आहे.नागरिकांनी वाहतूकीच्या नियमांचे पालन करून स्वतःचे सुरक्षितते बरोबरच इतरांची ही काळजी घेणे आवश्यक आहे. प्रत्येकाने हेल्मेटचा वापर करावा. सिग्नलचा वापर करावा. गाडी चालवताना लायसन्स असणे आवश्यक आहे. अती वेगाने गाडी चालवु नये.सुरक्षित जीवन जगण्यासाठी वाहतुकीचे नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.असे प्रतिपादन नियंत्रण शाखेचे पोलीस उपनिरीक्षक सॅम्युअल गायकवाड यांनी केले आहे. शहर वाहतूक नियंत्रण शाखा, हिंदसेवा मंडळाचे मेहेर इंग्लिश स्कूल व दादा चौधरी विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आईला नगर शहरामध्ये रस्ता वाहतूक सुरक्षा जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. दादा चौधरी विद्यालय येथील रॅलीला सुरुवात करण्यात आली. यानंतर शनी चौक,माणिक चौक, कापड बाजार,तेलीखुंट,नेता सुभाष चौक,चितळे रोड,पटवर्धन चौक यानंतर दादा चौधरी विद्यालयाच्या प्रांगणात रॅलीचा समारोप करण्यात आला.या रॅलीमध्ये साडेपाचशे विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. याप्रसंगी सर्व वाहतूक नियंत्रण शाखेचे पोलीस निरीक्षक सॅम्युअल गायकवाड मेहेर इंग्लिश स्कूलच्या प्राचार्य प्रा. अनुरीता झगडे,दादा चौधरी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका जयश्री नन्नवरे आदींसह शिक्षक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रा.अनुरीता झगडे म्हणाले,रस्ता सुरक्षा रॅलीसाठी हिंदसेवा मंडळाचे सर्व पदाधिकारी व शाळेचे चेअरमन जगदीश झालानी तसेच दादा चौधरी विद्यालयाचे चेअरमन अनंत देसाई यांचे अनमोल सहकार्य लाभले आहे. विद्यार्थ्यांना शालेय जीवनातच वाहतुकीच्या नियमांची माहिती होणे आवश्यक आहे. वाहतुकीच्या नियमांची जनजागृती करणे महत्त्वाचे आहे.

### विद्यार्थी प्रशिक्षणाचे आयोजन

संगमनेर खुर्द (स. गांवकरी) : महाराष्ट्र शासन कृषी विभागाच्या वतीने महाविस्तार ए आय ॲपच्या प्रचार प्रसिद्धीसाठी निमगाव बुद्रुक येथील कै. पं.रा. कानवडे कनिष्ठ महाविद्यालय येथे विद्यार्थी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले. महाराष्ट्र हे कृषी क्षेत्रात अग्रेसर राज्य आहे. महाराष्ट्र शासन कृषी विभागाच्या वतीने नुकतेच विकसित करण्यात आलेले अँड्रॉइड मोबाईल वरील महाविस्तार ए आय ॲप डाउनलोड करून शेतकरी बांधवांना हवामान, पिक सल्ला, आधुनिक तंत्रज्ञान, जमीन मृदा पत्रिका, बाजारभाव, खत गणक, कीड व रोगाच्या नियंत्रणासाठी उपाय योजना या ॲपच्या माध्यमातून उपलब्ध होणार आहे. या ॲप चे वैशिष्ट्य म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित चॅटबॉट. या चॅटबॉट च्या माध्यमातून शेतकरी बांधवांना कृषी विषयक कोणत्याही प्रश्नाचे अचूक उत्तर प्राप्त होऊन कृषी विभागाच्या विविध योजना मिळणे सुलभ होणार आहे. अहिल्यानगरचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री सुधाकर बोराळे साहेब व संगमनेरच्या तालुका कृषी अधिकारी श्रीमती रेजा बोडके यांचे मार्गदर्शनाखाली मंडळ कृषी अधिकारी ओंकार यन्नम व सहाय्यक कृषी अधिकारी विजय शेलार यांनी विद्यार्थ्यांना महा विस्तार ए आय डाउनलोड करण्याबाबत सविस्तर माहिती दिली. प्रशिक्षण यशस्वी करण्यासाठी कै. पं.रा. कानवडे कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. उद्धव उगले, श्री कढणे सर व श्री गाडेकर सर आदींचे सहकार्य लाभले. संगमनेर, अकोले, राहता व कोपरगाव तालुक्यातील सर्व गावांमध्ये क्षेत्रीय स्तरावरील सहाय्यक कृषी अधिकारी व उप कृषी अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी ॲप डाऊनलोड करावे, असे आवाहन संगमनेरचे उपविभागीय कृषी अधिकारी अक्षय गोसावी यांनी केले आहे.

# मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट संचालित मळगंगा प्रसादालयाचे काम कौतुकास्पद

**किसनराव घोगरे पाटील**

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट संचालित मळगंगा प्रसादालयाच्या माध्यमातून दररोज शेकडो गोरगरीब गरजू व भावीक यांना अन्नदान होत आहे हे कार्य सेवाभावी असून वाढदिवसाच्या निमित्ताने वायफळ खर्च न करता याठिकाणी दिलेली देणगी सार्थकी लागत असल्याचे प्रतिपादन पाटबंधारे विभागाचे सेवानिवृत्त अधिकारी किसनराव घोगरे यांनी व्यक्त केले आहे. दिल्ली येथे नामांकित औषध कंपनीत कार्यरत असलेले संदीप शांताबाई किसनराव घोगरे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त किसनराव घोगरे व शांताबाई घोगरे यांनी प्रसादलाला २१०० रुपये देणगी दिली. यावेळी ज्येष्ट पत्रकार दत्तात्रय उनवणे, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त संतोषशेठ रसाळ, विश्वस्त बबनराव ससाणे यांच्या हस्ते घोगरे दापंत्याचा सत्कार करण्यात आला यावेळी घोगरे पाटील बोलत होते. ते म्हणाले दररोज शेकडो भावीक व गरजू लोकांना माफक दरात अन्नदाणाचे पुण्यकर्म होत आहे. आपण दिलेली देणगी सार्थकी लागत असल्याचा विश्वास देणगीदात्यांना असल्याने गेली दिड वर्षात सुखा,दुखाच्या प्रसंगी वायफळ खर्चाला कात्री लावून हजारो देणगीदात्यांनी जवळपास पन्नास लाख रुपये देणगी दिली आहे. मळगंगा ट्रस्ट काम




अतिशय कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन त्यांनी व्यक्त केले आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विश्वस्त संतोषशेठ रसाळ यांनी केले शेवटी विश्वस्त बबनराव ससाणे यांनी आभार मानले.

मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे अध्यक्ष वसंत कवाद, उपाध्यक्ष अमृताशेठ रसाळ, सचिव शांताराम कळसकर, सहसचिव विश्वासराव शेटे, कोषाध्यक्ष रामदासशेठ वरखडे, संघटक मंगेश वराळ पाटील तसेच विश्वस्त मंडळ, सभासद,निघोज ग्रामस्थ व मुंबईकर मंडळ तसेच राज्यातील देवीचे लाखो भावीक यांच्या सर्वांच्या पाठबळाने मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचा नावलौकिक देवीच्या आशीर्वादाने वाढत असून या माध्यमातून जगप्रसिद्ध रांजणखळगे कुंड परिसरात तसेच गाव व परिसरात तिर्थक्षेत्र अंतर्गत व पर्यटन माध्यमातून मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध झाला असून जगप्रसिद्ध रांजणखळगे परिसरात खासदार नीलेश लंके यांनी पर्यटक निवास व भोजन कक्ष ईमारत यासाठी साडेपाच कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला असून लवकरच या ईमारतीचा लोकार्पण सोहळा संपन्न होणार आहे. ही इमारत अत्यंत अत्याधुनिक झाली असून जवळपास एकाच वेळी भोजन कक्षात पाचशे पर्यटक जेवतील तसेच पर्यटक निवासात एकाच वेळी हजारो लोक थांबतील एवढी सुसज्ज देखणी इमारत मळगंगा कंट्रक्शन कंपनीचे अध्यक्ष अमृताशेठ रसाळ व संचालक सागरशेठ रसाळ यांनी बांधली आहे. या ठिकाणी येत्या सहा महिन्यात व्यवसायीकांना गाळे देणार आहेत तसेच ईमारती शेजारील तलावात बोटींग व्यवस्था करणार आहे.

जेणेकरून पर्यटक व भावीक यांना या ठिकाणी निसर्गाच्या सान्निध्यात राहून आनंद घेता येईल अशाप्रकारे जगप्रसिद्ध रांजणखळगे हा परिसर एक निसर्गरम्य ठिकाण होण्यासाठी गावकरी व संस्था प्रयत्नशील आहेत. अशी माहिती मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त संतोषशेठ रसाळ व विश्वस्त बबनराव ससाणे यांनी दिली आहे.

## आमिष दाखवून फसवणारा गोल्डन गेटचा पर्दाफाश!

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

गुंतवणूकदारांनी गुंतवलेल्या रकमेवर अधिक परतावा देण्याचे आमिष दाखवून गुंतवणूकदारांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक करणाऱ्या गोल्डन गेटचा पोलसांनी पर्दाफाश केला. 'गोल्डन गेट फिन्सर्व्ह' आणि 'आर एस ग्रुप ऑफ बिझनेस' या बोगस कंपन्यांच्या माध्यमातून तीन गरीब मजुरांची ४० हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार तपासात उघडकीस आला. या संघटित गुन्ह्यामध्ये ऋषिकेश तोरडमल (रा. भिंगार) याच्यासह दत्तात्रय तोरडमल, मनीषा तोरडमल, प्रतिक्षा तोरडमल, कोमल क्षीरसागर, गणेश क्षीरसागर (रा. बालमटाकळी), वृषाली भालेराव, सचिन भालेराव (रा. भिंगार), प्रतीक गुरव (रा. पाथर्डी), किरण तोरडमल (रा. बारादरी), आणि सागर तोरडमल (रा. पुणे) यांचा समावेश आहे. फिर्यादी तानसेन सुरेश बिवाल (रा. राहुरी), मनीष दिपक सोलंकी, आणि एक महिला (दोघे रा. भिंगार) यांनी जानेवारी २०२५ मध्ये आरोपींशी संपर्क साधला. आरोपींनी फिर्यादींना त्यांच्या 'गोल्डन गेट फिन्सर्व्ह' आणि 'आर एस ग्रुप ऑफ बिझनेस' नावाच्या कंपनीत गुंतवणूक केल्यास १२ टक्के ते १५ टक्के परतावा मिळेल, असे सांगितले.

## 'शिव पाणंद' शेतरस्ता जनजागृती अभियानाचा मंत्रालयात शुभारंभ

- शिव पाणंद शेतरस्ता चळवळीचा मंत्रालयातून ऐतिहासिक एल्गार

**भिवंडी : (समर्थ गांवकरी)**



तमाम महाराष्ट्रातील शेवटच्या शेतकरी भावापर्यंत दर्जेदार शेतरस्ता पोहोचवण्याच्या उद्देशाने सुरू झालेली 'शिव पाणंद शेतरस्ता चळवळ' आता निर्णायक टप्प्यात पोहोचली असून, शासन निर्णयांच्या अंमलबजावणी साठी या चळवळीने मंत्रालयातून ऐतिहासिक एल्गार केला आहे.

"शेत तिथे रस्ता - गाव तिथे समृद्धी" हा नारा प्रत्यक्षात उतरवण्यासाठी चळवळीने एकात्मता, सामूहिक नेतृत्व आणि व्यापक जन भागीदारीचा मार्ग स्वीकारला आहे. गुरुवार, २७ नोव्हेंबर २०२५ रोजी राज्यभरातील पदाधिकाऱ्यांची समन्वय बैठक आझाद मैदान, मुंबई येथे झाली. आगामी आंदोलन, जनजागृती आणि प्रशासनाशी संवाद याबाबत महत्त्वपूर्ण रणनीती ठरवण्यात आली.

राज्य सरकार, प्रशासन आणि न्यायालयीन पातळीवर सातत्याने पाठपुरावा करत अनेक जिल्ह्यांत संघटन बळकट करण्यात चळवळीला यश आले. या संघर्षाचे फलित म्हणून सरकारने शेतकऱ्यांच्या हिताचे अनेक ऐतिहासिक निर्णय घोषित केले असून, चळवळीच्या वतीने सरकारचे आभार व्यक्त करण्यात आले.

या निर्णयांची जिल्हा आणि तालुका पातळीवर प्रभावी अंमलबजावणी व्हावी, यासाठी पदाधिकारी मंत्रालयात भेट देत संबंधित विभागांना निवेदने सादर करत आहेत. याच पार्श्वभूमीवर मंत्रालयातून राज्यव्यापी 'शिव पाणंद' शेतरस्ता जनजागृती अभियानाचा औपचारिक शुभारंभ करण्यात आला.

हे अभियान गाव, तालुका आणि जिल्हा पातळीवर मोठ्या प्रमाणात राबवून शासन निर्णयांचा लाभ प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत पोहोचवण्याचा निर्धार पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

# जिल्ह्यात एकल वापराच्या प्लास्टिक बंदीबाबत मोहीम राबवा - जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया

**जिल्हा पर्यावरण समिती बैठक संपन्न**

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

एकदाच वापराच्या प्लास्टिक वस्तूंवर बंदी असतानाही शहर व ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर साठवणूक, विक्री, वाहतूक आणि वापर सुरू आहे. त्यामुळे व्यापक जनजागृतीबरोबरच साठवणूकदार आणि विक्रेत्यांवर कठोर कारवाई करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिल्या. जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा पर्यावरण समितीची बैठक पार पडली. बैठकीस महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उपप्रादेशिक अधिकारी चंद्रकांत शिंदे, समितीचे सदस्य तथा हरियालीचे अध्यक्ष सुरेश खामकर, प्रा. डॉ. सतीश कुलकर्णी, रविराज पाटील, अमित लाटे, जिल्हा परिषद उपमुख्य कार्यकारी अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि इतर संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी डॉ.आशिया



म्हणाले, जिल्ह्यातील नगरपालिका व महापालिकांनी दरवर्षी पर्यावरणावरील स्थिती अहवाल तयार करणे बंधनकारक आहे. मात्र अनेक वर्षांपासून हा अहवाल तयार न केल्यामुळे पर्यावरणस्थितीचे अचूक आकलन होत नाही. त्यामुळे येथून पुढे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी हा अहवाल त्वरित तयार करावा, अशा सूचना त्यांनी दिल्या. बैठकीत विटभट्ट्यांमुळे होणारे प्रदूषण कमी करण्यासाठी आवश्यक उपाययोजना, नायलॉन मांजा साठवणूक, वाहतूक, विक्री व वापरावर पोलीस विभाग व स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत कठोर कारवाई, रस्त्यावरील धूळ नियंत्रणासाठी आधुनिक धूळशोषक यंत्रांचा वापर, नदीप्रदूषण नियंत्रण, घनकचरा व्यवस्थापन, वनक्षेत्र वाढविणे, तसेच पर्यावरण संरक्षण, संवर्धन व जनजागृती उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी यावर सविस्तर चर्चा झाली. पर्यावरणपूरक उपक्रमांना गती देण्यासाठी सर्व संबंधित विभागांमध्ये समन्वय साधण्याचा निर्णय समितीने घेतला. याबाबत आवश्यक त्या सुचना जिल्हाधिकाऱ्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

# शिवसेना ठाकरे गट व महाविकास आघीडीची पत्रकार परिषद संपन्न

**किनवट : (समर्थ गांवकरी)**

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने पत्रकार परिषदेत महाविकास आघाडीतील काँग्रेस उमेदवार शेख तयाबा बेगम शेख ख़ाज़मिया यांनी शिवसेना उद्धव ठाकरे ठाकरे पक्षाच्या समर्थन केल्याच्या घोषणेनंतर महाविकास आघाडीची संयुक्त पत्रकार परिषद मशाल कार्यालयात आयोजित करण्यात आली.

या पत्रकार परिषदेला शिवसेना जिल्हा प्रमुख ज्योतिबा खराटे, काँग्रेस तालुका अध्यक्ष सूर्यकांत रेड्डी, बाजार समितीचे माजी सभापती अनिल पाटील कऱ्हाळे, नगराध्यक्ष फिरोज डोसानी, तालुका प्रमुख मारोती



दिवसे पाटील, माजी नगराध्यक्ष के. मूर्ती, माजी नगराध्यक्ष अरुण आळणे, युवा नेते करण येंड्रलवार, शहराध्यक्ष गिरीश नेम्मानिवार, शहरप्रमुख प्रशांत कोरडे, अतुल दर्शनावाड, यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पत्रकार परिषदेत बोलताना जिल्हा प्रमुख ज्योतिबा खराटे यांनी भाजपावर टीका केला. ते म्हणाले की, "किनवटमध्ये भाजपा श्रेष्टींची मनमानी सुरू असून मूळ भाजपातील निष्ठावंत कार्यकर्त्यांची उघडपणे गळचेपी होत आहे. पुढे ते म्हणाले, "सरकार आणि स्थानिक आमदार फसव्या घोषणा करीत आहेत. राज्य सरकारच्या तिजोरीत पैसा नाही. 'लाडकी बहीण' योजनेतून मोठ्या प्रमाणात फसवणूक सुरू आहे. E-KYC च्या नावाखाली महिलांची दिशाभूल होत आहे." ज्योतिबा खराटे यांनी महाविकास आघाडीचाच पर्याय राज्यात मजबूत असल्याचे सांगितले. "भाजपला रोखण्यासाठी महाविकास आघाडीच आवश्यक आहे," असे ते म्हणाले.

शहराच्या प्रश्नांकडे लक्ष देण्याची गरज* : ज्योतिबा खराटे यांनी शहरासमोरील मूलभूत प्रश्नांची चर्चा केली. ते म्हणाले की, "महाविकास आघाडी सत्तेत आल्यास शहरात अत्यावश्यक सीसीटीव्ही कॅमेरे, औद्योगिक प्रकल्प, रिकामे गाळे सुरू करणे, पाणीपुरवठा आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यावर आम्ही भर देऊ."

युवा नेते करण येंड्रलवार यांनी बोलताना सांगितले की, शहरात "बेरोजगारी व व्यसनाधीनता वाढली आहे, या करिता उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे."*

युवा नेते करण येंड्रलवार यांनी युवकांच्या प्रश्नांवर थेट भाष्य केले. ते म्हणाले, "आज युवावर्ग बेरोजगारी, व्यसनाधीनता, जुगार आणि नादाला लागणे अशा समस्यांमध्ये अडकलेला आहे. मी शारीरिक शिक्षणाचा अभ्यासक असल्याने युवकांना क्रीडा व रोजगाराच्या माध्यमातून योग्य मार्गावर आणण्यासाठी प्रयत्न करणार आहे." करण येंड्रलवार यांनी त्यांच्या आई माजी जिल्हा परिषद सदस्य असल्याचा उल्लेख करताना महिला व युवतींसाठी अधिकाधिक उपक्रम राबवण्याचा संकल्प व्यक्त केला. त्यांनी सांगितले की, "महिलांना स्वावलंबनाचा आणि नेतृत्वाचा अनुभव मिळावा, यासाठी आम्ही ठोस काम करू."

या संयुक्त पत्रकार परिषदेमुळे महाविकास आघाडीमधील एकजूट आणि परस्पर सहकार्याचा मजबूत संदेश देण्यात आला. काँग्रेस उमेदवाराच्या समर्थनानंतर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी आघाडी बळकट करण्यासाठी केलेले विधान स्थानिक राजकारणात विशेष चर्चेचा विषय ठरत आहे.

# डॉ. विश्वासराव आरोटे यांच्याहस्ते सोलापूर चादरी व साड्यांचे वितरण !

- अगस्ती सहकारी साखर कारखान्यात ऊसतोड कामगारांना उबदार भेट!

**अकोले : (समर्थ गांवकरी)**





गुलाबी थंडीची चाहूल लागताच ऊसतोड कामगारांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी सामाजिक बांधिलकी जोपासत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस व दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी अकोले तालुक्यातील अगस्ती सहकारी साखर कारखान्यातील ऊसतोड कामगारांना सोलापूर चादरी व साड्यांचे वाटप केले.

या उपक्रमाला अगस्ती सहकारी साखर कारखान्याचे सिल्प मास्तर साईनाथ आरज चितळवेढे, विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या संचालिका परीघाताई आरोटे, मातोश्री विमलबाई आरोटे, नंदाबाई आरोटे तसेच सोनेरी आरोटे यांची उपस्थिती लाभली.

कामगारांच्या कठोर परिश्रमाची दखल घेत डॉ. आरोटे म्हणाले, "थंडीच्या दिवसांत ऊसतोड कामगारांच्या सुरक्षिततेची आणि आरोग्याची काळजी घेणे ही आपली सामाजिक जबाबदारी आहे. त्यांच्या हातात उबदार चादर आणि साडी देताना त्यांच्या चेहऱ्यावर आलेले समाधान हेच आमच्यासाठी मोठे समाधान आहे." उपस्थित मान्यवरांनी या उपक्रमाचे मनापासून कौतुक करत समाजातील मेहनतकऱ्यांसाठी राबवलेल्या या मदतकार्याचे स्वागत केले. या उपक्रमामुळे ऊसतोड कामगारांमध्ये आनंदाची भावना पसरली असून सामाजिक संवेदनशीलतेचा एक उत्तम आदर्श प्रस्थापित झाला आहे.



श्रीगोंदा : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानाची निर्मिती करून संपूर्ण देशात समानतेची मजबूत पायाभरणी केली, असे प्रतिपादन नायब तहसीलदार मिलिंद जाधव यांनी केले. ते राहुल विद्यार्थी वस्तीगृह, श्रीगोंदा येथे आयोजित संविधान दिन कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

## थोडक्यात बातम्या...



### हिरा इंग्लिश मीडियम येथे क्रीडा महोत्सव उद्घाटन सोहळा संपन्न

जुन्नर तालुका (स. गांवकरी) : ब्रिलियन्स एज्युकेशन फाउंडेशन अंतर्गत असणारी हिरा इंग्लिश मीडियम स्कूल खानापूर येथे क्रीडा महोत्सव उद्घाटन सोहळा प्रसिद्ध निवेदक रामकृष्ण भागवत यांच्या शुभहस्ते संपन्न झाला.याप्रसंगी ब्रिलियन्स एज्युकेशन फाउंडेशनचे चेअरमन जावेद तिरंदाज,संचालक हाजी इस्माईल खान,हाजी इब्राहिम खान,हाजी मोअज्जम खान,मुख्याध्यापक अझहर इनामदार हे मान्यवर उपस्थित होते. क्रीडा महोत्सवाच्या निमित्ताने रामकृष्ण भागवत यांनी शारीरिक तंदुरुस्तीसाठी शारीरिक व्यायाम जरुरी आहे क्रीडा महोत्सवाच्या निमित्ताने आपण आजपासून शरीराकडे व्यवस्थित लक्ष देऊन शरीर मजबूत राहण्यासाठी योग्य आहार घ्यावा.असा सुंदर संदेश विद्यार्थ्यांना दिला गेला. तंत्रज्ञानाच्या युगामध्ये मुलांनी मोबाईल मध्ये जास्त गुंतून न राहता मैदानी खेळामध्ये जास्तीत जास्त सहभाग घेऊन शरीर तंदुरुस्त बनवा काही सुंदर संदेश चेअरमन जावेद तिरंदाज यांनी विद्यार्थ्यांना दिली.हिरा इंग्लिश मीडियम खानापूर येथे सुरू झाल्यापासून दहावीचा निकाल शंभर टक्के लागला आहे. यासाठी मुख्याध्यापक अजहर इनामदार व सर्व शिक्षक यांचे बहुमोलाचे सहकार्य लाभत आहे.

### खंडूराज गायकवाड यांना राज्य सांस्कृतिक पुरस्कार जाहीर



मुंबई (स. गांवकरी) : लोककला क्षेत्रात भरीव कार्य केल्याबद्दल जेष्ठ पत्रकार खंडूराज गायकवाड यांना महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाचा राज्य सांस्कृतिक पुरस्कार जाहीर झाला. राज्यातील लोककलावंतांच्या प्रश्नावर गेली वीस वर्षांपासून कार्य करीत असलेले मंत्रालयातील जेष्ठ पत्रकार खंडूराज गायकवाड यांना सांस्कृतिक कार्य विभागाने प्रयोगात्मक कलेतील भरीव योगदानाबद्दल सन 2024 चा राज्य सांस्कृतिक पुरस्कार जाहीर केला आहेत. त्यांनी तमाशा सम्राटयी कै.विठाबाई नारायणगावकर यांच्या नावाने जीवन गौरव पुरस्कार सुरू करण्यासाठी शासन स्तरावर अथक प्रयत्न केले. राज्यातील लोककलावंत अनुदान शिफारस समितीवर त्यांनी काम केले आहेत. रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळाचे ते अनेक वर्षे सदस्य होते. मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाचे कार्यकारिणी सदस्य असून अनेक सामाजिक संस्थेशी खंडूराज गायकवाड जोडले गेलेले आहेत.

### समर्थ फार्मसीच्या दोन विद्यार्थ्यांची अश्वमेधसाठी निवड




जुन्नर तालुका (स. गांवकरी) : डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे व समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी बेल्हे यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरविभागीय खो-खो स्पर्धा नुकतीच समर्थ शैक्षणिक संकुल येथे पार पडली. या आंतरविभागीय स्पर्धेत पुणे,कोल्हापूर,सोलापूर, संभाजीनगर, जळगाव व नागपूर अशा सहा झोन मधून एकूण १८० विद्यार्थी व २० टीम मॅनेजर आणि क्रीडा शिक्षकांनी सहभाग नोंदवला अशी माहिती विद्यापीठाचे क्रीडा विभागाचे प्रतिनिधी प्रा. भोईर यांनी दिली.अंतिम फेरीत दोन विभागांमध्ये चुरशीची लढत पाहायला मिळाली. स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे:- खो-खो (मुलांचा गट)विजेतेपद:- कोल्हापूर विभाग उपविजेतेपद :– सोलापूर विभाग,खो-खो (मुलींचा गट) विजेतेपद:–सोलापूर विभाग,उपविजेतेपद:–कोल्हापूर विभाग स्पर्धेतील उत्तम खेळाडू,फिटनेस आणि संघातील सक्रिय सहभाग यानुसार विद्यापीठ पातळीवर खो-खो संघामध्ये एकूण मुले व मुली मिळून ३० खेळाडूंची निवड करण्यात आली.निवड समिती तील पंच व क्रीडा अधिकारी यांनी पारदर्शक,काटेकोर निवड प्रक्रियांचे पालन केले.समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी मधील दोन विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय अश्वमेध साठी निवड झाल्याची माहिती प्राचार्य डॉ.कुलदीप रामटेके, पुणे क्रीडा विभागाचे सेक्रेटरी प्रा.एच.पी नरसुडे,संकुला तील क्रीडाशिक्षक सुरेश काकडे तसेच विभागप्रमुख यांनी दिली.सर्व विजेत्या खेळाडूंचे संस्थेचे अध्यक्ष वसंत शेळके उपाध्यक्ष माऊली शेळके सचिव विवेक शेळके,विश्वस्त वल्लभ शेळके,माजी जिल्हा परिषद सदस्या स्नेहलताई शेळके,कॅम्पस डायरेक्टर प्रा. राजीव सावंत,प्रशासकीय अधिकारी प्रा.प्रदीप गाडेकर समर्थ कॉलेज ऑफ फार्मसी चे प्राचार्य डॉ.संतोष घुले तसेच संकुलातील सर्व प्राचार्य विभागप्रमुख,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

# सोनोग्राफी व गर्भपात केंद्रांची अचानक तपासणी करा – जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



जिल्ह्यातील घटते लिंग गुणोत्तर रोखण्यासाठी सोनोग्राफी व गर्भपात केंद्रांची अचानक तपासणी, संशयित प्रकरणांची चौकशी व जन्म-मृत्यू नोंदी वेळेत करण्याच्या कडक सूचना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिल्या. कोणत्याही केंद्राकडून नियमांचे उल्लंघन झाल्यास कठोर कारवाई करावी, असे निर्देशही त्यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित एचपीव्ही लसीकरण कृती दल, नियमित लसीकरण, लिंग गुणोत्तर, गर्भलिंग तपास प्रतिबंधक कायदा (PCPNDT), जन्म-मृत्यू नोंदणी, क्षयरोग नियंत्रण व राष्ट्रीय आरोग्य अभियान यांच्या आढावा बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांनी सूचना केल्या.

या बैठकीस जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय घोगरे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बापूसाहेब नागरगोजे, महापालिकेचे वैद्यकीय अधिकारी डॉ. सतीष राजूरकर, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. रवींद्र कानडे, कार्यक्रम अधिकारी संजय कदम, जिल्हा परिषदेचे शिक्षण अधिकारी (प्राथमिक व माध्यमिक), उपजिल्हा व ग्रामीण रुग्णालयांचे वैद्यकीय अधीक्षक, तालुका आरोग्य अधिकारी, सर्व पंचायत समित्या (दूरदृश्य प्रणालीद्वारे) तसेच इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

बैठकीत १४ वर्षे पूर्ण झालेल्या मुलींना एचपीव्ही लसीकरण मोहिमेसाठी वैद्यकीय अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण, सर्व खासगी रुग्णालयांनी प्रसूतींच्या नोंदी आरोग्य वाहिनी माहिती प्रणाली (HMIS) संकेतस्थळावर अनिवार्यपणे नोंदवणे, नवजात बालकांना २४ तासांत हेपेटायटिस-बी (शून्य) लसीचा डोस देणे, खासगी डॉक्टरांनी क्षयरोग रुग्णांची माहिती व उपचार अहवाल वेळेवर सादर करणे याबाबत सूचना करण्यात आल्या.

याशिवाय, गरोदर मातांच्या नियमित पाठपुराव्यात ढिलाई होऊ नये, गावस्तरीय समित्यांनी मासिक आढावा घेऊन प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढावीत, अशा सूचनाही जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या.

जिल्ह्यातील आरोग्य निर्देशांक सुधारण्यासाठी शासकीय यंत्रणा, स्थानिक स्वराज्य संस्था, खासगी वैद्यकीय व्यावसायिक व नागरिकांनी एकत्र येऊन कार्य करण्याचे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले.




**ठाणे :** दिव्यात मुंब्रादेवी कॉलनी येथे अथर्व संकुलातील गणेश मंदिरात पहाटेच्या वेळी चोराने दानपेटी चोरून नेल्याची घटना घडली आहे. दिव्यात दिवसेंदिवस अशा चोरीच्या घटना मोठ्या प्रमाणावर वारंवार होत असल्याने महिला वर्ग व ज्येष्ठ नागरिकांनी पोलिसांवर नाराजी व्यक्त केली असून संबंधित दानपेटी चोरीचा घटनेसंदर्भात रहिवासी पोलीस चौकीला जाऊन देखील पोलीस तक्रार न झाल्याने राहिवास्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. **(फोटो - संतोष पडवळ)**

# वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ संपन्न

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**



पुष्पावती विद्यालय डिंगोरेचा वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात मंगल ईशस्तवन व प्रतिमा पूजनाने करण्यात आली. यानंतर विद्यालयातील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांचे मनमोहन केले.

वर्षभरात विविध क्षेत्रात योगदान देणाऱ्या मान्यवरांचा,विविध स्पर्धांमध्ये प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा तसेच विद्यालयासाठीआर्थिक व साहित्यिक मदत करणाऱ्या देणगी दारांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते पाटोदा येथील सरपंच भास्कर पेरे पाटील यांनी उपस्थितांना स्वच्छता,स्वच्छ पाणी,उत्तम शिक्षण,वडीलधाऱ्यांचा आदर, स्त्री-सुरक्षा आणि गावातील हरितावरण यांचे महत्व समजावून सांगितले.ग्रामपंचायतच्या वाढीव करातून गावकऱ्यांना अधिक सुविधा उपलब्धकरण्याचे आवाहन त्यांनी केले.

सामूहिक शेती,सामूहिक खरेदी, घरातील वयोवृद्धांशी संवाद,तसेच बाहेरी ल पदार्थ टाळून आरोग्य जपणे याबाबतही त्यांनी मौलिक सूचनांचे मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान चंद्रकांत लोहोटे यांनी भूषविले.

# निसर्गाच्या सान्निध्यात चिमुकल्यांचा जलक्रीडेचा आनंद



**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

रॉयल एज्युकेशन इंग्लिश स्कूल,ओतूरच्या पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी शुक्रवार,दिनांक २८ नोव्हेंबर २०२५ रोजी भीमाशंकर निसर्गाच्या रमणीय सान्निध्यात असलेल्या येथील स्क्वीरल वॉटर पार्क येथे एका अविस्मरणीय शैक्षणिक सहलीचा अनुभवघेतला एकूण ४२ चिमुकल्या विद्यार्थ्यांनी या सहलीमध्ये उत्साहाने सहभाग घेतला होता.

शैक्षणिक सहलींचा उद्देश केवळ मनोरंजन नसून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून ज्ञान देणे आणि त्यांच्या सामाजिक कौशल्यांना वाव देणे हा असतो याच उद्देशाने आयोजित केलेल्या या सहलीमध्ये,विद्यार्थ्यांना शहराच्या गजबजाटापासून दूर,निसर्गाच्या हिरव्यागार वातावरणाचा आणि मोकळ्या हवेचा अनुभव घेता आला.वॉटर पार्कच्या ठिकाणी पोहोचल्यावर,सर्व विद्यार्थ्यांनी आनंदाने विविध प्रकारच्या जलक्रीडांचा मनमुराद आनंद लुटला पाण्यातील विविध राइड्स आणि गेम्स खेळून मुलांनी एकच कल्ला केला..!! या जलक्रीडांमुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि उत्साह ओसंडून वाहत होता..!!

खेळ आणि धमाल केल्यानंतर, विद्यार्थ्यांनी पार्कच्या परिसरात उपलब्ध असलेल्या विविध चविष्ट खाद्यपदार्थांचा आस्वाद घेतला.ही सहल विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि अभ्यासासोबतच मनोरंजनासाठी एक महत्त्व पूर्ण पाऊल ठरली.

# कंधार नगरपालिकेवर कोणाचा झेंडा ?

**कंधार : (समर्थ गांवकरी)**

कंधार नगपालिकेची स्थापना १९५६ दरम्यान झाली तेव्हापासून बऱ्याच पक्षाचे नगरअध्यक्ष या नगपालिकेवर सत्ता काबीज केली. अनेक नेत्यांनी सुद्धा पालिकेचे नेतृत्व केलं.पालिकेला अनेक पुरस्कार हि मिळाले आहेत. महाराष्ट्रात कंधार नगरपालिकेचा दर्जा महाराष्ट्राच्या यादीत आहे पण येथील राजकारण व प्रशासनाच्या गलथान कारभारामुळे कंधार शहराच्या अनेक समस्या कायम असून २०२५ ची सत्ता हा मतदार कोणाला देणार आणि नगरपालिकेवर कोणाचा झेंडा असेल याची चर्चा प्रभागात होत आहे. २०१६ च्या कंधार नगरपालिका निवडणुकीमध्ये काँग्रेसचा नगराध्यक्ष विजयी झाला होता तर बहुमत शिवसेनेला मिळाले होते. यंदा नगराध्यक्षपद ओबीसी प्रवर्गासाठी राखीव असून राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस आणि भाजपामध्ये तिरंगी लढत होण्याची शक्यता आहे. त्यामुळे तीन्ही पक्षाच्या उमदेवारांनी शहरात जोरदार प्रचाराला सुरवात केली असली तरी विकासाच्या मुद्द्यावर निवडणूक होणार असल्याचे चित्र साध्य गल्लीबोळातील ज्येष्ठ तरुणाईत चर्चा आहे.

# एआय आधारित बनावट वन्यप्राणी व्हिडिओ तयार करणाऱ्यांवर कारवाई : सोमनाथ घार्गे

## अहिल्यानगर जिल्हा व्याघ्र कक्ष समितीची बैठक संपन्न

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**




जिल्ह्यात वाढत्या मानव – बिबट्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर एआय आधारीत बनावट वन्यप्राणी व्हिडिओ तयार करून नागरिकांमध्ये भीती निर्माण करणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशा सूचना जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिल्या.

ते जिल्हा व्याघ्र कक्ष समितीच्या बैठकीत बोलत होते. बैठकीस उपवनसंरक्षक धर्मवीर सालविठ्ठल, समितीचे सदस्य सचिव व विभागीय वनअधिकारी (दक्षता) नाशिक डॉ. अजित साजणे, सहाय्यक वनसंरक्षक अनिल पवार, गणेश मिसाळ, सौ. अश्विनी दिघे, वनपरिक्षेत्र अधिकारी अविनाश तेलोरे, दादासाहेब वाघुलकर, मानद वन्यजीव रक्षक मंदार साबळे, पोलीस निरीक्षक सुधाकर कुहाडे व किरणकुमार कबाडी (स्थानिक गुन्हे शाखा) आदी उपस्थित होते.

पोलीस अधीक्षक श्री. घार्गे म्हणाले, वनविभागातील क्षेत्रीय अधिकाऱ्यांना पोलिसांकडून शस्त्र हाताळणीचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. तसेच मानव–बिबट्या संघर्षाबाबत जनजागृती करण्यासाठी पोलिसांच्या विविध गावांतील व्हॉट्सअॅप गटांमध्ये वनअधिकाऱ्यांचा समावेश केला जाणार आहे. वन्यप्राणी अपघात टाळण्यासाठी अपघातप्रवण 'ब्लॅक स्पॉट' ओळखणे, तसेच अस्तित्वातील आणि नव्या विहिरींना सुरक्षित कठडे बांधण्याबाबत शेतकरी व संबंधित विभागांना आवाहन करण्यात यावे. मानव–वन्यजीव संघर्षाच्या वेळी कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांची मदत तत्परतेने उपलब्ध करून दिली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

बैठकीदरम्यान क्षेत्रीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना शस्त्र हाताळणीचे प्रशिक्षण देणे, वनविभाग – पोलीस विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मॉक ड्रिल आयोजित करणे, तसेच तालुकास्तरीय समन्वय समित्या स्थापन करून त्यांची नियमित बैठक घेणे याबाबत सविस्तर चर्चा झाली.

जिल्ह्यातील अलीकडील मानव–बिबट्या संघर्षाच्या घटनांचा आढावा उपवनसंरक्षक श्री. सालविठ्ठल यांनी बैठकीत सादर केला. भविष्यातील आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी शासनाकडे सादर केलेल्या प्रस्तावांवरही चर्चा झाली.

गावपातळीवर "वन पाटील" ही मानद संकल्पना राबविण्याबाबत बैठकीत सर्वानुमते निर्णय घेण्यात आला. वन व वन्यजीव संवर्धनात रुची असलेल्या इच्छुक व्यक्तींना या मानद पदासाठी निवड करून शासनास प्रस्ताव पाठविण्याचे ठरविण्यात आले.

वनविभाग –पोलीस विभागातील समन्वय अधिक मजबूत करण्यासाठी आणि क्षेत्रीय कर्मचाऱ्यांचे मनोबल उंचावण्यासाठी बैठकीत मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या.


हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# रामराज्य प्रस्थापित करा; धनुष्यबाणाला निवडून आणा

**हिमायतनगर: (समर्थ गांवकरी)**

हिमायतनगर नगरपंचायत निवडून आणण्याकरिता रामराज्य प्रस्थापित करा धनुष्यबाणाला निवडून आणा असे संबोधन गुलाबराव पाटील राज्याचे पाणीपुरवठा मंत्री यांनी केले हिमायतनगर प्रतिनिधी राज्याचे मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री एकनाथ भाई आपल्या पाठीमागे असल्यामुळे आपल्या शहराचा विकास ऐतिहासिक प्रकारे होईल आणि गेली तीस वर्षापासून शिवसेनेमध्ये असलेले रामभाऊ ठाकरे यांच्या माध्यमातून आपल्याला हिमायतनगरचा विकास करायचा आहे आणि आपल्या पाठीमागे आपले लाडके आमदार बाबुरावजी कोळेकर हे सुद्धा आपल्या तालुक्याचे नेतृत्व करत असल्यामुळे आपल्याला भरपूर काही यश मिळेल आणि प्रत्येक गोष्टीला आपल्याला सहकार्य राहील विकासापासून कोसो दूर असलेल्या हिमायतनगर नगरपंचायत ला आपल्याला पुढे आणायची जर असेल तर रामभाऊला मतदान करा पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांनी पाणीपुरवठ्यासाठी हिमायतनगर तालुक्याला भरघोस निधी देण्याची ग्वाही दिली .दिनांक २८ नोव्हेंबर रोजी शुक्रवारी या ठिकाणी भाजपची व शिवसेनेची दोन्ही दोन्ही सभा पार पडल्या भाजपच्या सभेमध्ये अशोकराव चव्हाण यांनी गुलाबराव वर टीका केली अशोकराव का टीका करतात असे गुलाब राव पाटील चे म्हणणे होते त्यांचे पिढ्यान पिढ्या राजकारण चालू आहे तर इतकी दुरावस्था का हिमायतनगर कुठेही रस्ते नाहीत गल्लीमध्ये बोळीमध्ये घाण सगळी असल्यामुळे लोकांना त्रास होत आहे अशोकराव जनतेमध्ये संभ्रम निर्माण करीत आहेत असे गुलाबराव पाटलांची टीका केली यावेळीबाबुराव पाटील कोहळीकर म्हणाली की जनतेने सावधान पणाने मतदान करावे राज्यात एकनाथ बाईच्या माध्यमातून अनेक विकास कामे झालेले आहेत यापुढेही विकासाचा वेग कायम ठेवण्यासाठी शिवसेनेचे नगरसेवक नगराध्यक्ष यांना भरघोस मतांनी निवडून द्या असे आव्हान बाबुराव कोळेकर यांनी केले.






मंचर : कळंब ता.आंबेगाव येथे बिबट्याच्या हालचाली वाढल्याने वनविभागाने शाळेजवळील ओढ्याच्या शेजारी पिंजरा उभारला.परिसरातील वाढत्या धोक्याच्या पार्श्वभूमीवर तातडीने केलेली ही कारवाई ग्रामस्थांसाठी दिलासादायक ठरली आहे.

## थोडक्यात बातम्या...



### सोमानी यांनी मुख्यमंत्री सहायता निधी मध्ये दिला ५१ हजार रुपयांचा धनादेश

वाशिम (स. गांवकरी) : महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई प्रदेश कार्याध्यक्ष व तरुण कांति मंच जिल्हाध्यक्ष, स्वामी विवेकानंद शिक्षण व व्यायाम प्रसारक मंडळ धनज बु चे अध्यक्ष सामाजिक कार्यकर्ते निलेश सोमानी यांनी मातोश्री स्वर्गीय स्नेहलता पूनमचंद सोमानी यांच्या स्मृतीप्रित्यर्थ मुख्यमंत्री सहायता निधी मध्ये 51 हजार रुपयांचा धनादेश राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सुपूर्द केला. नगरपालिका निवडणूक प्रचाराकरिता वाशीम येथे आले असता मंचावर निलेश सोमानी यांनी राज्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांना धनादेश सुपूर्द केला यावेळी वाशिम मंगरूळपीर आमदार शाम खोडे, कारंजा विधानसभा आमदार सई डहाके, खासदार अनुप धोत्रे, भाजपा जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम चितलांगे, भाजपा नेते राजू पाटील राजे, आमदार गोरखे, आमदार बाबूसिंग नाईक समवेत मान्यवर उपस्थित होते. यापूर्वी सोमानी यांनी विविध सामाजिक संस्था व कार्याला मदत केलेली आहे यावेळी मुख्यमंत्री यांना सोमानी यांनी स्वतः लिहिलेले मेरा देश बदल रहा है हे पुस्तक भेट दिले.




### संविधान दिन उत्साहात साजरा

श्रीगोंदा (स. गांवकरी) : तालुक्यातील जिल्हा परिषद उंडेमळा शाळेत भारतीय संविधान दिन विविध उपक्रमांनी आणि उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांनी मानवी साखळी तयार करून भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक पठण केल्याने झाली. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध घोषवाक्यांच्या माध्यमातून भारतीय लोकशाहीप्रती आपली निष्ठा व आदरभाव व्यक्त केला. संविधान दिनानिमित्त शाळेत विद्यार्थ्यांसाठी हस्ताक्षर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत यशस्वी ठरलेल्या विद्यार्थ्यांचे मान्यवरांच्या हस्ते अभिनंदन करण्यात आले. कार्यक्रमास शालेय व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्षा श्रद्धा गायकवाड, सदस्या नयनतारा शिंदे, सविता मांडे, सुलोचना मांडे आदी मान्यवर उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे आयोजन शिस्तबद्ध पद्धतीने पार पडले. शेवटी सहशिक्षक संतोष इंगावले यांनी उपस्थितांचे आभार मानले.



### उदगीर नगर परिषद नळामधून काही सोनं देती की काय

- उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे टीकास्त्र

उदगीर (स. गांवकरी) : उदगीर शहरामध्ये आतापर्यंत जो विकास झाला नाही , असा विकास आम्ही करणार आहोत , विकासाचा झेंडा हाच आमचा अजेंडा असेल , उदगीर मध्ये चांगल्या आरोग्य सुविधा मिळतील याकडेही लक्ष दिले जाणार आहे . उदगीर नगर परिषदेच्या वतीने नळपट्टीच्या पोटी 3000 रुपये घेतले जातात , हा खूप मोठा कर आहे , एवढी नळपट्टी घेऊन नगरपरिषद काय नळामधून सोने देते की काय अशी उपरोधिक टीका राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली . उदगीर जि . लातूर येथे शिवसेना पक्षाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सुनीता पंचाक्षरी व सर्व नगरसेवक यांच्या प्रचारार्थ येथील क्रीडा संकुल मैदानावर सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी त्यांनी बोलताना सांगितले की , उदगीर साठी आम्ही नगर विकास खात्याच्या वतीने साडेपाचशे कोटी रुपयांचा निधी दिला . परंतु या निधीचा दुरुपयोग झाला आहे . याचा व्हिडिओ जर चांगला झाला नसेल तर त्याचाही शोध घेतला जाईल .तसेच विकासाच्या नावाखाली झालेल्या धिंगाणा खपवून घेतला जाणार नाही असे देखील त्यांनी ठणकावून सांगितले . उदगीर जिल्ह्याची मागणी अनेक वर्षापासून होत आहे परंतु याकडे दुर्लक्ष होत आहे . नागरिकांच्या सोयीसाठी उदगीर जिल्हा होणे गरजेचे आहे उदगीर जिल्ह्यासाठी जे जे काही लागेल त्यासाठी मी पाठपुरावा करेल अशी ग्वाही देखील त्यांनी दिली . यासोबतच उदगीरला एमआयडीसीसाठी लागणारी जमीन आहे त्यासाठी निधी देखील लवकर उपलब्ध करून दिला जाईल असे आश्वासन देखील दिले . उदगीर मध्ये 2022 प्रमाणे क्रांती घडणार आहे, उदगीर नगर परिषदेवर शिवसेनेचा भगवा फडकणार आहे, असे सांगून विरोधकांनी कितीही केली किरकिर तरीही शिवसेना जिंकणार उदगीर , विरोधक जातील घरी आणि निवडून येतील सुनीता पंचाक्षरी , कितीही आले तलेराव तरी सर्वात पुढे असणार भालेराव , अशा देखील त्यांनी शायऱ्या मारल्या.

# ठोस सामाजिक कार्य केल्याशिवाय कोणताही गौरव स्वीकारणार नाही

- खा. नीलेश लंके यांचा निर्धार
- स्वातंत्र्य सेनानी सेनापती बापट स्मृती पुरस्कार सन्मानपूर्वक प्रदान

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

जोपर्यंत मी एखादे ठोस सामाजिक कार्य पूर्ण करत नाही, तोपर्यंत कोणताही सन्मान स्वीकारणार नाही, अशी ठाम भूमिका खासदार नीलेश लंके यांनी व्यक्त केली.सोशल पारनेर सामाजिक संस्था व कृषी व जनसेवा प्रतिष्ठानतर्फे देण्यात आलेल्या स्वातंत्र्यसेनानी सेनापती बापट स्मृती पुरस्कारांचे वितरण खासदार लंके यांच्या हस्ते झाले . यावेळी ते बोलत होते.

ज्येष्ठ साहित्यिक साहेबराव ठाणगे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.नवनिर्वाचित नगराध्यक्षा डॉ.विद्या कवरे, उपनगराध्यक्षा सुप्रिया शिंदे यांचा यावेळी नागरी सत्कार करण्यात आला. डॉ.रफीक सय्यद (आरोग्य व अध्यात्मिक कार्य),पारनेर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रंगनाथ आहेर (शिक्षण, संस्कृती व पर्यावरण),पारनेर तालुका पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष संजय वाघमारे (पत्रकारिता, लेखन व सामाजिक चळवळ), सुरेश खोसे पाटील ( उत्कृष्ठ पत्रकारिता ), देवीदास आबूज(पत्रकारिता व साहित्य),प्रसाद तारे (शिवचरित्रकार), प्रकाश गाजरे (आदर्श गाव), मार्तंड बुचूडे (पत्रकारिता),अलका कदम (महिला सक्षमीकरण),गणपत वाफारे (समाजसेवा), राजेंद्र देशपांडे (समाजसेवा),अनिल भंडारी (समाजसेवा) यांना यांना स्वातंत्र्यसेनानी सेनापती बापट स्मृती पुरस्काराने गौरवण्यात आले.

कृषी व जनविकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष अरुणराव आंधळे, शिक्षक नेते रा.या.औटी, ज्येष्ठ विधीज्ञ पी.आर.कावरे, मारूती शेरकर, सोशल पारनेरचे अर्जून भालेकर, ॲड सोमनाथ गोपाळे, पत्रकार विनोद गायकवाड, श्रीनिवास शिंदे, भगवान गायकवाड, पत्रकार दिपक वरखडे, प्रा . डॉ . जाधव नंदकुमार देरेकर,विठ्ठल औटी, दिलीप भालेकर, संजय देशमुख, सुधाकर देरेकर,गौरव भालेकर,बिंदूराज भालेकर, वसिम राजे,साहिल शेख, सुभाष आग्रे आणि इतर उपस्थित होते.

खासदार लंके म्हणाले की, सेनापती बापटांच्या पुण्यतिथीदिनी त्यांच्या जन्मस्थळावर त्यांना अभिवादन करणे म्हणजे क्रांतींची,समाजसेवेची प्रेरणा, उर्जा घेण्यासारखे आहे.सेनापती बापटांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधत, सोशल पारनेर,कृषी व जनविकास प्रतिष्ठानने पारनेर तालुक्यातील विविध क्षेत्रात भरीव योगदान देणाऱ्या व्यक्तींचा सन्मान केला, ही पारनेरकरांच्या दृष्टीने अभिमानाची बाब आहे. यातील एकाही पुरस्कार्थीच्या कामाबाबत शंका उपस्थित केली जाऊ शकत नाही, असा विश्वास खासदार लंके यांनी व्यक्त केला.

अधक्षस्थानावरून बोलताना ज्येष्ठ साहित्यिक साहेबराव ठाणगे म्हणाले की,आपापल्या क्षेत्रात काम करणाऱ्या माणसाला पुरस्कार मिळाला किंवा पाठीवर थाप पडली, तरी ती खूप महत्वाची असते. त्यामुळे आणखी जोमाने काम करण्यास ऊर्जा मिळते. तरुण पिढीस या पुढील काळात नोकऱ्या मिळणार नाहीत, त्यासाठी त्यांनी स्वतःचे उद्योगधंदे सुरु करावेत. असे आवाहन ठाणगे यांनी केले.

कृषी व जनविकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष अरुणराव आंधळे म्हणाले की,सेनापती बापटांच्या विचारांना व समाजसेवेची प्रेरणा देणाऱ्यांना प्रकाशात आणणे, हा या पुरस्काराचा हेतू आहे. अर्जून भालेकर यांनी प्रास्ताविक केले.प्रा.अशोक शिंदे यांनी सूत्रसंचालन केले, तर अरूणराव आंधळे यांनी आभार मानले.



## प्रा. आर. एस. माने यांच्या संशोधन प्रयोगशाळेचा विक्रम

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील भौतिकशास्त्र संकुलाचे संचालक प्रा. राजाराम एस. माने यांच्या संशोधन प्रयोगशाळेने यंदा उल्लेखनीय यश मिळवत, एका वर्षात तब्बल २० संशोधन लेख स्कोपस-सूचीबद्ध नियतकालिकांमध्ये प्रकाशित करण्याचा अभूतपूर्व विक्रम नोंदविला आहे. उत्कृष्ट संशोधन कार्य, सातत्यपूर्ण अभ्यास, तांत्रिक कौशल्य आणि नेतृत्वक्षमता यांच्या जोरावर प्रा. माने यांनी आजवर मिळविलेल्या एकूण संशोधन कामगिरीत मोठी भर पडली आहे. सध्या त्यांचा एच-इंडेक्स ७०, एकूण १८,३०७ उद्धरणे (सायटेशन्स), तसेच आयटेन-इंडेक्स ३२२ असा प्रभावी शैक्षणिक दर्जा असून, हे त्यांच्या संशोधन क्षेत्रातील सातत्यपूर्ण योगदानाचे द्योतक आहे. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील कॅम्पसमध्ये इतक्या उच्च दर्जाचे, प्रेरणादायी आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर नावाजलेले संशोधक आणि मार्गदर्शक कार्यरत असल्याचा अभिमान आहे. त्यांच्या नेतृत्वाखालील संशोधन गटाने केलेली ही कामगिरी विद्यापीठाच्या संशोधन परंपरेला नवी दिशा देणारी ठरली आहे.

## श्रीरामपूर शहरातील नागरीकांची गत झाली मोठी केवीलवाणी !

**श्रीरामपूर : (समर्थ गांवकरी)**

शहराच्या पुर्व आणी उत्तर भागात पंजाबी कॉलनी, दशमेशनगर,सिंधी कॉलनी, नेहरुनगर, आदर्श हौसिंग सोसायटी, काझीबाबारोड, आदर्शनगर आदी भागात पिण्याच्या पाण्याच्या नळांद्वारे गटारीचे दुर्गंधीयुक्त घाण पाणी येत असुन या घाण पाण्यामुळे नागरीकांच्या आरोग्याचा मोठा ज्वलंत प्रश्न निर्माण झाला आहे.

संबंधित नगर पालिका प्रशासनास अनेकवेळा तक्रारी देवूनही काहीच उपयोग होत नसल्याने तथा कोणतीच दखल घेतली जात नसल्याने संबंधित परिसरातील नागरीकांना मोठ्या समस्यांचा सामना करणे भाग पडत आहे.



हा प्रश्न केवळ आजचा नसुन वर्षानुवर्षांचा आहे, कोणत्याही नगरसेवक लोकप्रतिनिधींनी आजवर याची दखल घेतलेली नाही,केवळ मतदानापूरते पोकळ आश्वासने द्यायची आणी निवडणूक संपताच मिस्टर इंडिया व्हायचे हा त्यांचा आजवरचा इतिहास आहे.

संबंधित लोकप्रतिनिधी लक्ष देत नाही आणी नगर पालिका प्रशासन ही दखल घेत नाही अशा दुहेरी संकटाचा परिसरातील समस्त नागरीक नेहमीच सामना करताना दिसुन येत आहे.

त्यात सध्या शहरात नगर पालिका निवडणुक धामधूमीचे वारे सुरु असल्याने शहर व परिसरातील आजी, माजी, भावी नगरसेवक, नगराध्यक्ष या ज्वलंत प्रश्नी लक्ष देणार का ? असा प्रश्न त्रस्त नागरीकांकडून उपस्थित केला जात आहे. की यावेळी देखील मतदानापूर्ते पोकळ आणी खोटे आश्वासने देवून त्यांची बोळवण करत पुन्हा मिस्टर इंडिया रिलिज होणार असल्याचे पाहणे जरी दुर्दैवी ठरणारे असले नगर पालिकेच्या निवडणुकीत योग्य वेळी योग्य संधीचा शहरातील नागरीकांनी देखील फायदा घेत योग्य उमेदवारास मतदान करत आपला हक्क बजावणे तीतकेच महत्वाचे ठरणार आहे.तरच अनेको वर्षांच्या या प्रलंबित ज्वलंत प्रश्नास वाव मिळू शकेल. असे परिसरातील त्रस्त नागरीकांचे ठाम मत झाले असल्याचे यावेळी दिसून येत आहे.

# विद्यार्थ्यांनी नियमांचे पालन करावे - न्यायाधीश यु बी भोसले. जामखेड तालुका न्यायालय

### जामखेड मध्ये संविधान दिन उत्साहात संपन्न

**जामखेड तालुका: (समर्थ गांवकरी)**

रयत शिक्षण संस्थेच्या श्री नागेश विद्यालय ज्यूनियर कॉलेज व कन्या विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने संविधान दिन अतिशय उत्साहात संपन्न झाला. यावेळी संविधान व भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष जामखेड तालुका न्यायालयाचे न्यायाधीश श्रीमती यु बी भोसले ( दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर जामखेड) मॅडम होते तर प्रमुख उपस्थिती. जामखेड तालुका वकील संघ अध्यक्ष अँड प्रमोद राऊत राऊत,उपाध्यक्ष अमीर पठाण, डॉ सागर शिंदे, अँड हर्षल डोके , अँड एम एन नागरगोजे, अँड पी जे थोरात, अँड बी एस घोडेस्वार, अँड ए एस कुंभार, अँड के डी गायकवाड, सपकाळ हनुमान ,वाळूनजकर अक्षय ,प्राचार्य मडके बी के, मुख्याध्यापिका भोर आर आर, उपमुख्याध्यापक नाळे एस एन, पर्यवेक्षक संजय हजारे ,एनसीसी ऑफिसर मधील भोसले, सागर ढगे

नागेश कन्या विद्यालय विद्यार्थी, एनसीसी कॅडेट, वकील संघटना, तालुका विधी सेवा समिती सदस्य व शिक्षक उपस्थित होते आदी मान्यवर उपस्थित होते.

संविधान उद्देशिका सामूहिक वाचन करण्यात आले. कु आव्हाड समीक्षा, श्रेयश रेळेकर, तृप्ती उकिरडे या विद्यार्थिनी संविधान दिनानिमित्त उत्कृष्ट भाषण सादर केले. प्रसिद्ध डेंटल डॉक्टर सागर शिंदे यांनी पंधरा अनाथ विद्यार्थीचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारून त्यांची शैक्षणिक सर्व फी १९६०० रुपये न्यायाधीश भोसले मॅडम च्या हस्ते विद्यालय सुपूर्द केली. वकील संघटनेचे अध्यक्ष एडवोकेट प्रमोद राऊत यांनी मनोगतात संविधान दिन व विविध कायद्यांची माहिती दिली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष सन्माननीय न्यायाधीश श्रीमती यु बी भोसले मॅडम यांनी संविधानामुळे आपल्या सर्वांचे हक्क सुरक्षित आहेत. विद्यार्थी जीवनात सर्वांनी नियम पाळावेत, 18 वर्षाखालील विद्यार्थ्यांनी मोटार सायकल वापरू नये. संविधानामध्ये मूलभूत हक्कांची ग्वाही,अधिकार, स्वातंत्र्य दिलेले असून ,काही मार्गदर्शक तत्त्वे, कर्तव्य व आपले कामे सुद्धा दिलेली आहेत. व चुकीच्या प्रवृत्तीवर निर्बंध सुद्धा घातलेले आहेत असे मनोगत व्यक्त करून संविधानाचे महत्त्व अतिशय सोप्या भाषेत विद्यार्थ्यांना सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका भोर आर आर,सूत्रसंचालन संभाजी इंगळे आभार प्रदर्शन प्राचार्य मडके बीके यांनी केले.




# हरिश्चंद्र मेडिकल फाउंडेशन कॉलेज ऑफ नर्सिंग अँड रिसर्च सेंटरचा निकाल जाहीर!

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्यातील महाराष्ट्रातील सर्वात उंच शिखर कळसुबाई पर्वतरांगांमध्ये वसलेले हरिश्चंद्र मेडिकल फाउंडेशन कॉलेज ऑफ नर्सिंग अँड रिसर्च सेंटर, अकोले या संस्थेने यावर्षी उत्तुंग यशाची नोंद केली आहे.

शैक्षणिक वर्ष 2024-25 मधील जी.एन.एम. प्रथम वर्षाचा निकाल जाहीर झाला असून 100 टक्के विद्यार्थ्यांनी उत्तीर्ण होत एक मोठी कामगिरी साध्य केली आहे. संस्थेच्या वतीने सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले.

ग्रामीण भागातील आरोग्य सेवेला भांडकोळी दांपत्यांचे मोठे योगदान: अकोले तालुक्यातील ग्रामीण भागात डॉ. भांडकोळी दाम्पत्याने आरोग्य सेवेत मोलाचे योगदान देत नेहमीच सर्वांसाठी प्रेरणादायी कार्य केले आहे. त्याच परंपरेत त्यांनी स्थापन केलेल्या हरिश्चंद्र मेडिकल फाउंडेशन कॉलेज ऑफ नर्सिंग अँड रिसर्च सेंटरने जी.एन.एम. प्रथम वर्षासाठी गुणवत्तापूर्ण प्रशिक्षण व शिस्तबद्ध कार्यप्रणाली अवलंबली होती.

शासन धोरण आणि विद्यार्थ्यांचे कल्याण या दोन्हींचा समन्वय साधत संस्थेच्या प्रवर्तक डॉ. ज्योती भांडकोळी यांनी शिक्षक वृंदासमवेत विद्यार्थ्यांना भक्कम असे प्रशिक्षण दिले. "फर्स्ट इम्प्रेशन टू लास्ट इम्प्रेशन" या तत्त्वावर कार्य करत संस्थेने गुणवत्तेचा झेंडा कळसुबाई शिखरावर अभिमानाने रोवला आहे. शिक्षकवृंदाचा परिश्रम व मार्गदर्शन, या यशामध्ये महत्त्वाचा वाटा उचलणारे शिक्षकवृंद, प्राचार्य कविता माने मॅडम, उपप्राचार्य कीर्ति गंदले मॅडम, पुनम कांबळे मॅडम, नसर शेख सर (सीनियर टीचर), पंकज प्रधान सर यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी केलेल्या अथक परिश्रमांचे विशेष कौतुक करण्यात आले. संस्थेचे मार्गदर्शक डॉक्टर एम. भांडकोळी यांनी सर्व विद्यार्थी, शिक्षकवृंद व प्रशासनाचे अभिनंदन करत पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.




### जी.एन.एम. प्रथम वर्षातील गुणवंत उत्तीर्ण विद्यार्थी

1. प्रवीण बगाड
2. प्रीती भालेराव
3. समीक्षा भोसले
4. सुरज भुजबळ
5. रोशनी चव्हाण
6. वनिता दाभाडे
7. सीमा धिंदळे
8. राहुल दिघे
9. शिवानी गंभीरे
10. प्रवीण घोडे
11. स्वाती घोडे
12. स्वाती घोडे चिमा
13. माधुरी हिले
14. सपना इंदोळे
15. शितली दे
16. महेश कचरे
17. किशोर कचरे
18. किसन कोळपे
19. शैला लोहोकरे
20. प्रेरणा मदगे
21. हर्षला मदगे
22. लक्ष्मी माळी
23. अंकुश नाडेकर
24. साक्षी तळेकर
25. संगीता सारुकते
26. शितल शिंगवे
27. बाळू वाळेकर
28. अनुजा वाळेकर
29. राणी वायाळ
30. श्वेतली परसूर

# 'टाइम बँक'; वेळेचा जमा-खर्च



## संपादकीय

"आयुष्य किती सरलंय माहीत आहे, किती उरलंय माहीत नाही. पैसे किती सरलेत, किती उरलेत माहीत आहे, आला दिवस सरणार आहे माहीत आहे दिवसाचा एकेक क्षण का सरता सरत नाही तासन्तास विचार करूनही कळत नाही." पंचाहत्तर वर्षाच्या एका व्यक्तीचे हे शब्दही आज बहुसंख्य ज्येष्ठ नागरिकांची कैफियत आहे. हे आजोबा किंवा आजी अंथरुणाला खिळलेले नाहीत. चांगले हिंडते-फिरते आहेत; पण रोज जाणार तरी कुठे? आयुष्यभर भरपूर प्रवास झाला, नाटक-सिनेमे पाहून झाले, वाचन झालं. आता ते घरात एकटेच राहतात. घर आवरून तरी किती आवरणार? स्वयंपाकात तरी किती वेळ घालवणार? सोसायटीतल्या त्याच त्याच लोकांशी तेच तेच किती वेळा बोलत राहणार? आणखी काही तरी वेगळं पाहिजे. वेगळे लोक, वेगळे विषय. नवा उत्साह देणारे, कशाची, कुणाची तरी वाट पाहता आली पाहिजे. सगळ्यांची भावना थोड्याफार फरकाने हीच असते.

पैशांच्या मोबदल्यात जे मिळतं त्याच्या पलीकडलं काहीतरी हवं असतं. भारतातच नाही, तर परदेशातही तीच परिस्थिती आहे. लांबलेलं आयुष्य, चांगल्या संधींच्या शोधात दुसऱ्या ठिकाणी गेलेले किंवा एकाच घरात राहूनही आपापल्या व्यापात, विवंचनांत बुडालेले आप्तस्वकीय, सारखं शेजारी बसायला, बोलायला कोण मिळणार? याच विषयावरच्या एका नाटकात साठ वर्षांचा एक मुलगा आपल्या नव्वद वर्षांच्या धडधाकट वडिलांसाठी 'जेएफएस' या संस्थेच्या स्वयंसेवकाला बोलावतो असा प्रसंग होता. ती मुलगी आल्यावर सांगते, "आम्ही तरुणांनी 'ज्युनिअर्स फॉर सीनिअर्स' अशी संस्था सुरू केली आहे. आम्ही सीनिअर्सना त्यांचे इंटरेस्ट विचारतो आणि त्या विषयांसंबंधी त्यांच्याशी गप्पा मारायला आमच्यातलं कुणीतरी जातं. त्यासाठी पॉकेटमनीइतकेच किरकोळ पैसे आम्ही घेतो." नंतर एक आजी हौशी क्रोशे विणकामवाली स्वयंसेवक मिळेल का बघतात. ती मिळाल्यावर आजींना नवतंत्र कळतं, तरुणीला जुन्या पद्धती कळतात, असं काहीसं त्या नाटकात दाखवलं होतं. किती सोयीची व्यवस्था आहे ही. उतारवयात तरुण पिढीची संगत जास्त ऊर्जादायी वाटते. तरुणदेखील त्यांच्या आई-वडिलांच्या पिढीपेक्षा आजी-आजोबांच्या पिढीच्या बाबतीत जास्त समंजस, सहनशील असतात. कुणीतरी आपल्या आवडीच्या विषयासंबंधी आपल्याशी गप्पा मारायला आपल्या घरी येणार आहे, बोलायला ही भावना किती उत्साह निर्माण करणारी असेल ते त्या टप्प्यावर अद्याप न पोहोचलेल्या व्यक्तीला कळणं अवघडच. तरुणपणी आपण कुणासाठी वेळ दिला तर तो आपल्या खात्यात जमा करून पुढे आपल्याला उपयोगी पडेल, अशी व्यवस्था करणारी 'समयपेढी-टाइम बँक' ही संकल्पना हळूहळू रुळते आहे. 'टाइम इज मनी' हे तत्त्व स्वीकारून तिथे पैशांचा व्यवहार होत नाही, तर वेळ हेच चलन मानून एकमेकांना मदत केली जाते. ही योजना फक्त ज्येष्ठ नागरिकांसाठी नाही; पण त्यांना त्याचा सगळ्यांत जास्त उपयोग होतो. 'टाइम बँक' उपक्रमात एखाद्याकडचे फोटो बघून नीट लावून देण्यापासून त्यांचं स्कॅनिंग करून देण्यापर्यंत किंवा पुस्तक वाचून दाखवण्यापासून गप्पा मारण्यापर्यंत दुसऱ्यासाठी केलेलं कोणतंही काम गृहीत धरलं जातं. एकच व्यक्ती कधी वेळ देणारी होते, तर कधी दुसऱ्याचा वेळ मागणारी होते. त्यानुसार त्यांच्या खात्याचा हिशेब ठेवला जातो. एक तास दुसऱ्यासाठी दिला तर आपल्या खात्यात एक तास जमा होतो, दुसऱ्याचा एक तास वापरला तर खात्यातून एक तास वळता होतो. ज्या व्यक्तीसाठी एक तास दिला त्याच्याचकडून एक तास पुन्हा मिळवायचा नसल्याने तरुण व्यक्तीसुद्धा एकमेकांच्या कामांसाठी त्याचा वापर करून घेऊ शकतात. ही योजना पहिल्यांदा अमेरिकेत सुरू झाली. आता जगभरातल्या अठेचाळीस देशांत ती सुरू आहे. www.timebanks.org ही शीर्षस्थ संस्था स्थापन झाली आहे. तिचे जवळपास पाच लाख सदस्य आहेत आणि 'रोटरी' सारख्या संस्था या उपक्रमाशी संलग्न होऊ लागल्या आहेत. शीर्षस्थ संस्था नव्या बँकांच्या उभारणीसाठी मदत करते.

## दै. समर्थ गांवकरी सूडोकू क्र. ५१

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | | 2 | 6 | | | | | |
| | 3 | | | 5 | 7 | | | 2 |
| | | 7 | 1 | 2 | | 4 | 3 | |
| | 4 | | 3 | | | 6 | 8 | |
| | | | | | | | | |
| | 6 | 9 | | | 1 | | 4 | |
| | 5 | 6 | | 4 | 3 | 1 | | |
| 3 | | | 7 | 6 | | | 2 | |
| | | | | | 5 | 3 | | 9 |

उत्तर उद्याच्या अंकात

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे. या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

### सूडोकू क्र. ५० चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 4 | 6 | 5 | 1 | 7 | 3 | 9 | 2 |
| 1 | 9 | 7 | 2 | 3 | 4 | 8 | 6 | 5 |
| 2 | 5 | 3 | 8 | 9 | 6 | 7 | 1 | 4 |
| 3 | 1 | 8 | 4 | 5 | 9 | 6 | 2 | 7 |
| 5 | 7 | 9 | 6 | 2 | 3 | 1 | 4 | 8 |
| 4 | 6 | 2 | 7 | 8 | 1 | 9 | 5 | 3 |
| 7 | 2 | 1 | 9 | 4 | 8 | 5 | 3 | 6 |
| 9 | 8 | 4 | 3 | 6 | 5 | 2 | 7 | 1 |
| 6 | 3 | 5 | 1 | 7 | 2 | 4 | 8 | 9 |

| पंचांग | संवत्सर – विश्वावसूनाम | नक्षत्र:उत्तराभाद्रपद |
|---|---|---|
| ३० नोव्हेंबर २०२५ | अयन- दक्षिणायान | २५:१०:४१+ |
| रविवार | मास- मार्गशीर्ष | योग:वज्र ०७:११:५७ |
| विक्रम संवत्- २०८२ | ऋतु- सौर हेमंत | योग:सिद्ध २८:२१:३७+ |
| मार्गशीर्ष शके | शुक्ल पक्ष | करण:तैतिल १०:२७:५९ |
| संवत्- १९४७ | तिथि:दशमी २१:२९:२९ | करण:गर २१:२९:२९ |

## उपदेशाचे डोस

### मदत

अमेरिका स्वतंत्र झाल्यानंतरची घटना. रस्त्याच्या कडेने जात असताना लष्कराची गाडी अडचणीच्या जागेत अडकली होती. आतील शिपाई उतरुन तिला बाहेर काढण्याचा प्रयत्न करु लागले. त्यांच्यावरचा अंमलदार फक्त हुकूम देत होता.

त्याने मदत केली असती तर गाडी नक्की निघाली असती पण तो होता साहेब ! फक्त हुकूम देत उभे राहणेच त्याने पसंत केले. तेवढ्यात तिकडून एक गाडी आली.

त्या गाडीतून एक सज्जन उतरला. त्याने सैनिकांना प्रत्यक्ष हातभार लावला. गाडी अडचणीतून बाहेर पडली. दुसऱ्या गाडीतून आलेला तो सज्जन अंमलदार साहेबाला म्हणाला, पुन्हा गरज पडली तर मला बोलवत जा आणि त्याने आपल्या कोटाच्या खिशात हात घातला. आपला पत्ता असलेले कार्ड बाहेर काढले व त्या अंमलदारला दिले.

त्याने ते सहज म्हणून वाचले. त्याला दरदरुन घाम फुटला. कारण मदतीला आलेला तो सज्जन अमेरिकेचा सर्वेसर्वा अध्यक्ष जॉर्ज वॉशिंग्टन होता.

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- २००६ – हॉलीवुडच्या वार्षिक अहवालानुसार, ऑस्कर पुरस्कार विजेती अभिनेत्री निकोल किडमन हॉलीवुडची सर्वात महागडी अभिनेत्री आहे. ती आपल्या एका चित्रपटासाठी सरासरी दीड कोटी डॉलर घेते.
- २००६ – पाकिस्तानचा मधल्या फळीतील फलंदाज मोहम्मद युसूफने एका वर्षात सर्वाधिक कसोटी धावा बनविण्याचा वेस्टइंडीजचा महान फलंदाज विवियन रिचर्डचा ३० वर्ष जुना विक्रम मोडला. रिचर्डने १९७६ मध्ये ११ कसोटी सामन्यात १७१० धावा बनविल्या होत्या. तर युसूफने ११ कसोटी सामन्यात १७८८ धावा बनविल्या.

### राष्ट्रीय

- १९२८ – लखनौ येथे सायमन कमिशनच्या निषेधार्थ काळे झेंडे दाखवून निदर्शने केल्याबद्दल. पंडित नेहरूंसह इतर निदर्शकांवर लाठीमार करण्यात आला.


### जन्म

- १६६७ – जोनाथन स्विफ्ट, गलिव्हर्स ट्रॅव्हलचा लेखक.
- १८३५ – सॅम्युएल क्लेमेन्सचा जन्म. मार्क ट्वेन या नावाने तो गाजला.
- १८५८ – जगदीशचंद्र बोस, आंतरराष्ट्रीय ख्यातीचे भारतीय संशोधक.
- १९०८ – बुद्धदेव बसू, बंगाली कवी व कथाकार.

### निधन

- १९०० – ऑस्कर वाईल्ड, प्रसिद्ध आयरिश कवी, नाटककार, साहित्यिक विद्वान.

## दै. समर्थ गांवकरी जम्बो शब्दकोडे क्र. ५१



**आडवे शब्द**

१. '.... याचवेळी तू असशील तेथे बाळा पाजविले'- 'गदिमां'ची कविता
९. नवऱ्याचा भाऊ
१०. धातूवर कोरलेली देवप्रतिमा
११. श्वान
१२. उत्तर-पश्चिममधील उपदिशा
१४. रवाळ
१६. मांडणी करणारा
१९. भूपती, राणीचा पती
२०. आश्रय
२१. खून
२२. बाज विणण्याची रुंद पट्टी
२४. आणि
२५. माकडातील एक प्रकार
२७. एकूणएक, सर्व
३०. विश्वासघातकी
३२. समुद्रातील अग्नी
३३. किरकोळ सामान
३६. थोरवी
३८. रेशमी धोतर
४०. उंटाच्या पाठीवरील उंचवटा
४१. पराभव, माळ
४२. अथवा, किंवा
४३. षष्ठीचा देवता
४५. कच्चे लिखाण (इंग्रेजी)
४६. चषक, पेला
४९. आजच्या आधीचा दिवस
५०. मिठाची चव
५२. लोचट वागणेबोलणे
५४. रत्नाने मढविलेला दागिना
५५. विविध
५६. पातळ खांब
५८. अन्न घशाशी येऊन पोटात ढवळणे
५९. वर्ष, साल
६१. विद्येचे माहेरघर
६२. भुतांचा राजा
६४. खोटाच्या विरूद्ध
६५. वेदना
६६. 'आम्ही जातो आमुच्या गावा, आमुचा ---- घ्यावा'
६८. मर्यादा, हद्द
६९. शोध, मार्ग
७१. वारा
७३. जन्म-मृत्यू
७४. पु.ल. देशपांडे यांचे एक विनोदी नाटक

**उभे शब्द**

१. कैफ, नशा
२. दार
३. बारावी रास
४. रम्य, मनोहर
५. नुकसान
६. मगर
७. चैतन्य, जीव
८. मुलेबाळे असलेला
१३. दुःख
१५. गूढपणे, गूढरीत्या
१७. देशाचे नाणे
१८. कर्ण
१९. भारताचे दोन महान ग्रंथ
२३. उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्री
२५. उत्तराधिकारी
२६. स्थितिस्थापकत्वाचा गुण असलेला पदार्थ
२८. पारंब्या असलेला वृक्ष
२९. तरतरीत, ताजा ---
३०. नीच, दृष्ट
३१. अनाथ
३४. फळावरील साल
३५. सडेतोड बोलणारा
३७. शंकर
३९. रुग्णालय
४३. मनाला टोचणारे दुःख
४४. ईर्ष्या, बळ
४७. नावापुरता अननसाचा भाऊबंद
४८. नटविणे
४९. संध्याकाळ
५१. टिंगल करणारा
५३. कमी होणे (भाव, तब्येत वगैरे)
५५. ख्रिसमस (मराठीत)
५७. दंड आणि भेद करण्याआधी करण्याचे दोन उपाय
५८. जखमेवर लावण्याचे स्निगध औषध
६०. साहित्यातील नऊ भावना
६१. प्राचीन, जुने
६३. वाट फुटेल तसे वेगाने पळणे
६५. हिंदीत शपथ
६६. रात्रीचा पाऊस
६७. श्रीरामाचे एक नाव
७०. विडा
७१. चाळीस शेर
७२. चुलती (हिंदी)

उत्तर उद्याच्या अंकात

**शब्दकोडे क्र. ४९ चे उत्तर**

आडवे उत्तर : १.प्रिया आज माझी नसे साथ द्याया ९.जलसा ११.तव १२.काना १३.दफन १४.अनाकलनीय १६.नीर १८.सगा १९.सरस २१.यथार्थ २२.विठ्ठल रखमाई २४.कलेवर २६.पावा २७.सजा २९.कसा ३०.भयंकर ३१.रत्नाकर ३४.तलाव ३६.बडगा ३७.मलमल ३९.कलाकंद ४१.अंतर ४२.कीटाळ ४३.सराईत ४६.रजतपट ४९.पसा ५१.अंतरिक्ष ५२.पर ५४.लवकर ५७.रेलचेल ५९.सट्टा ६०.मन ६१.यदा ६३.भार ६४.कक्ष ६५.वदन ६९.वारी ७०.वणवा ७१.दानव ७२.शारदा ७४.वंदन ७५.पान ७६.खानदान ७८.कलाकार ७९.वापर ८०.अनाथ ८१.सर्रास

उभे उत्तर : २.यातना ३.आवकजावक ४.माननीय ५.नका ६.सेनानी ७.थट्टा ८.यादगार ९.जनसभा १०.सालस १४.अनेकदा १५.यथासंभव १७.रविवार १८.सलवार १८.सलवार २०.रईस २३.खडक २५.रसातल २६.पाककला २८.जादूगर ३२.रबर ३३.काल ३५.सदरा ३७.महिरप ३८.मदत ३९.कळप ४०.कंस ४१.अंत ४२.कीट ४४.ईश्वर ४५.परिचय ४७.जरतर ४८.पहारेकरी ५०.साल ५१.अंजन ५३.चाचे ५५.वसन ५६.कट्टा ५७अ.लक्ष ५८.लवण ६२.दारोदर ६३.भाग्यवंत ६६.दवाखाना ६७.अननस ६८.कशाला ६९.वानवा ७०.वन ७१.दादा ७३.रकाना ७५.पार ७७.नथ ७८.कस

# पारनेरला दिवसा लाईट देणार : अमोल पाटणकर



**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

पारनेर तालुक्यासह संपूर्ण राज्यातील शेतकऱ्यांना दिवसा शेतीपंपासाठी वीजपुरवठा सुरू करण्याबाबत सरकारकडून सकारात्मक हालचाली सुरू झाल्या असल्याची माहिती मुख्य उपसचिव अमोल पाटणकर यांनी दिली. राज्यभरात बिबट्या, वाघ, लांडगा, साप यांसारख्या हिंस्र प्राण्यांच्या झपाट्याने वाढलेल्या हल्ल्यांमुळे शेतकऱ्यांच्या जीविताला गंभीर धोका निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांची दिवसा वीज देण्याची मागणी प्रशासकीय पातळीवर मान्य करण्याचे ठोस संकेत मिळाले आहेत.

नारायणगव्हाण येथील सामाजिक कार्यकर्ते सचिन शेळके व महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेतरस्ता चळवळीचे प्रणेते शरद पवळे यांनी ऊर्जामंत्र्यांकडे सविनय निवेदन सादर करून शेतकऱ्यांच्या अडचणीची सविस्तर माहिती दिली.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, अतिवृष्टी–दुष्काळ, पिकांचे घसरलेले दर, गगनाला भिडलेली खतांची किंमत यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. त्यातच रात्री १० ते सकाळी ६ या वेळेतच मिळणारी वीज ही मोठी समस्या ठरत आहे.

या वेळेत बिबट्या, लांडगा, वाघ व साप यांची दहशत चरमसीमेवर असते. अनेक शेतकरी, महिला आणि लहान मुले यादरम्यान हिंस्र प्राण्यांच्या हल्ल्यांचे बळी ठरले आहेत. "रात्री पाणी देण्यासाठी शेतात जाणे म्हणजे प्रत्यक्ष मृत्यूच्या तोंडात जाण्यासारखे झाले आहे. कुटुंबातील कर्ता पुरुष जीव गमावत असल्याने अनेक कुटुंबे उघड्यावर पडत आहेत."

कांदा, भाजीपाला, ऊस यांसारख्या पिकांसाठी दिवसा सिंचन आवश्यक असून रात्रीच्या विजेमुळे उत्पादन घटते, पिकांचे नुकसान वाढते तसेच शेतकऱ्यांच्या कष्टात प्रचंड वाढ होते, असे निवेदनात नमूद करण्यात आले. शेतकरी देशाचा अन्नदाता असून उद्योगांना २४ तास वीज पुरवठा मिळत असताना बळीराजालाही दिवसा वीज मिळणे हा त्याचा प्राथमिक हक्क असल्याची भावना राज्यभरातील शेतकऱ्यांमध्ये तीव्र आहे.




ठाणे, दिवा : शिवसेना दिवा शहर आयोजित गणेशपाडा येथे मा. नगरसेविका दर्शना म्हात्रे व विभागप्रमुख चरणदास म्हात्रे यांच्यावतीने भव्य दोन दिवशीय मोफत आधारकार्ड शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात नावात बदल, पत्ता बदल तसेच जन्मतारीख बदल, लहान मुलांचे नवीन आधार कार्ड काढणे तसेच आदी दुरुस्त्या करून नागरिकांना मोफत मिळत आहेत. प्रभाग क्र. २८ मधील नागरिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकांनी केल आहे. सदर शिबिराला पहिल्या दिवशीच नागरिकांचा भरघोस प्रतिसाद लाभला आहे.

## थोडक्यात बातम्या...

### निवडणूक आली की काँग्रेसच्या नेत्यांना मुस्लिम व दलितांचे मते दिसतात

कंधार (स. गांवकरी) : कंधार नगरपालिका निवडणुकीच्या तोंडावर काँग्रेस पक्षाचे नेत्यांना मुस्लिमाचे व दलितांचे मत दिसतात त्यांच्या भागाचा विकास नाही काँग्रेसचे नेते मंडळींना मतदान पाहिजे त्या प्रभागाच्या त्या भागाचा विकास मात्र काँग्रेसच्या नेत्यांना दिसत नाही अशी ही चर्चा परिसरामध्ये होत आहे .निवडणुका आले की मुस्लिम व दलित मतदार दिसतात काँग्रेसला मत पाहिजे त्या भागाचा विकास फक्त निवडणुका आले की काँग्रेसला विकास दिसतो त्या त्या गल्लीचा, निवडणुका झाल्या की मुस्लिम व दलित समाजाच्या गल्लीचा विकास काँग्रेसच्या लोकांना दिसत नाही फक्त काँग्रेसच्या नेत्याचा व त्यांच्या घरच्यांचा विकास दिसतो मत पाहिजे विकास नाही परिसरामध्ये एकच चर्चा कंधार शहरात मुस्लिम व दलित मतदानावर काँग्रेसचे नेते फार मोठे झाले २५, ३०, वर्ष काँग्रेसच्या हातात नगरपालीकेची सत्ता दिली ज्यांनी मतदान केले त्या भागाचा वीस वर्षांपासून विकास झाला का ?आणि निवडणुका आल्या की काँग्रेसच्या नेत्यांना मत फायजे , विकास फक्त निवडणुकीच्या पुरतं त्या भागाचा विकास करून विकास करू निवडणुका झाले की काँग्रेसच्या नेत्याचा विकास करून काँग्रेसच्या नेत्यांचा विकास जनतेचा त्या प्रभागाचा नाही त्या मुस्लिम -दलित भागाच्या मतदाराचे मतदान पाहिजे विकास काँग्रेसच्या नेत्यांच्या व परिवाराचा आपला विकास करू अशी भावना काँग्रेसचे नेत्यांची आहे अशी चर्चा होत आहे.

### भाजप उमेदवारच्या प्रचारात दिग्गज उतरले मैदानात

तामसा (स. गांवकरी) : नगरपरिषद हदगांव येथे भाजप शिवसेना युति लढतीबाबत चित्र स्पष्ट झाल्याने भाजप च्या उमेदवाराच्या प्रचारार्थ भाजप चे नेते आज उमेदवारा सोबत प्रचार करत घरो घरी भेटी दिल्या . नांदेड जिल्ह्यातली महत्वाची नगर पालिका म्हणून हदगाव नगर पालिकेला विशेष महत्व आहे. हदगांव नगरपरिषद च्या प्रभाग १(अ) चे उमेदवार काळे अरुणा गुणवंत,प्रभाग क्र. १(ब) चे उमेदवार सचिन गोविंदराव सूर्यवंशी,प्रभाग ४(अ) चे उमेदवार बाभुळकर रुखमाबाई पिराजी व प्रभाग ५(ब) चे उमेदवार कदम बालाजी पांडुरंग हे उमेदवार असून मा. मुख्यमंत्री खा. अशोक चव्हाण व जिल्हा अध्यक्ष ऍड किशोर देशमुख यांनी हदगांव नगरपरिषद वर व्यक्तिगत लक्ष देत आपल्या पक्षांचे उमेदवार ला विजय करण्यासाठी मिशन हदगांव मनहून हदगांव तालुक्यातील दिग्गज भाजप स्टार प्रचारक मनहून भाजप जिल्हा उपाध्यक्ष सुरेश सारडा, जिल्हा सरचिटणीस तातेराव वाकोडे पाटील,तालुका अध्यक्ष भागवत देवसरकर, आनंद भंडारी, शिरीष मनाठकर, अविनाश शहाणे, सुशील नावडे, जिल्हाउपाध्यक्ष पदवीधर प्रकोष्ठ महेश मठपती, डॉ. भगवान निळे, डॉ दिपक नाईक, जेष्ठ भाजप नेता भारती ताई कराळे, विद्याधर देशमुख, उमाकांत भोरे, महिला आघाडी तालुका अध्यक्ष ममता जोशी यांना भाजप उमेदवार च्या प्रचारात वेग देण्यासाठी मतदारांना' डोर टू डोर 'गाठीभेटी सुरु केली असून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

### १० - १२ दिवस गावात पाणी पुरवठा बंद ग्रामस्थ संतप्त

नायगाव (स. गांवकरी) : नायगाव तालुक्यातील बरबडा येथील ग्रामपंचायतीच्या निष्काळजीपणामुळे बरबडा गावात १० १२ दिवसांपासून पाणी पुरवठा बंद आहे. बरबडा सर्कल चे गाव आहे. या गावात १५ सदस्य आहेत व नऊ दाहाजार गावातील लोक संख्या आहे बरबडा ग्रामपंचायतींच्या निष्काळजी पणामुळे बरबडा येथे अनेक कारणें सागने चालू आहे आहे गावातील वार्ड २ क्रमांक चार मध्ये गल्ली गल्ली आठ ते दहा ते दिवस झालं पाणी नसल्यामुळे संतप्त महिलांनी ग्रामपंचायत कार्यालय वर घागर मोर्चा काढण्याच्या मार्गावर आहेत सरपंच व ग्रामसेवक आणि प्रशासन यांचा निष्काळजीपणामुळे ग्रामपंचायतीने कार्यालयल जर दोन दिवसात पाण्याचा प्रश्न नाही मिटला बरबडा गावातील महिला भगिनी तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे दोन तिन दिवसांत पाणी पुरवठा सुरळीत करण्यात यावे अशी मागणी होत आहे. बरबडा येथील ग्रामविकास अधिकारी सुर्यकांत बोडले यांना पाणीपुरवठा कदि सुरूवात होणार याबाबत माहिति विचारण्यासाठी फोन केला असता फोन बंद होता

### कृष्णर एमआयडीसी मध्ये बिबट्याचा हल्ला! तरुण गंभीर जखमी

नायगाव (स. गांवकरी) : नायगाव तालुक्यातील बरबडा सर्कल अंतर्गत असलेल्या बरबडा येथील तरुण कृष्णुर एमआयडीसी परिसरात बुधवारी सकाळी बिबट्याने अचानक हल्ला चढवून श्रीकांत शिवाजी पुलवाड हा तरुण नेहमी प्रमाणे जाने येने करीत असताना गंभीर जखमी झाला. या घटनेमुळे परिसरात संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले असून गावकऱ्यांत भीतीचे सावट पसरले आहे. जखमी पुपलवाड यांना तातडीने घुंगराळा येथील डॉ. राठोड यांच्या दवाखान्यात हलवून प्राथमिक उपचार करण्यात आले. घटनेची माहिती मिळताच वसंत सुगावे पाटील यांनी रुग्णालयात धाव घेत जखमी तरुणाची भेट घेऊन प्रकृतीची विचारपूस केली. यावेळी त्यांनी वनपरिक्षेत्राधिकारी देवकत्ते यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून घटनास्थळावरील परिस्थितीची माहिती दिली. त्यानंतर वनविभागाच्या अधिकाऱ्यांची टीम तातडीने घुंगराळा-कृष्णर परिसरात दाखल होऊन बिबट्याच्या शोधासाठी मोहिम हाती घेतली. वनविभागाने परिसरात गस्त वाढवली असून बिबट्याचा बंदोबस्त करण्यासाठी विशेष पिंजरा लावण्याचे काम सुरू आहे. दरम्यान, घुंगराळा, कृष्णुर आणि एम आयडीसी परिसरातील नागरिक, शेतकरी, कामगारांनी अत्यंत सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. "बिबट्या कुठेही दिसल्यास तात्काळ वनविभागाशी संपर्क साधावा," असे आवाहनही अधिकाऱ्यांनी केले आहे. वन्यप्राण्यांच्या वाढत्या वावरामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून प्रशासनाने तातडीने पावले उचलावीत, अशी मागणी स्थानिकांकडून होत आहे.बिबटयाला पाडण्यासाठी वनविभागाने शर्थीचे प्रयत्न चालू होते.

# काम करणाऱ्यांना साथ द्या - आमदार काशिनाथ दाते सर

## वनकुटे येथे ८९ लक्ष रुपयांच्या विविध विकासकामांचे भुमिपूजन संपन्न




**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

शुक्रवार दि. २८ नोव्हेंबर २०२५ वनकुटे गावात मंजूर झालेल्या विविध विकासकामांचे भूमिपूजन पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांच्या शुभहस्ते उत्साहात संपन्न झाले. यावेळी उपस्थितांशी संवाद साधताना आमदार काशिनाथ दाते सर म्हणाले की, "वनकुटे गावात सर्व जाती-धर्माचे लोक वर्षानुवर्षे शांततेत आणि ऐक्याने नांदत आहेत. काही व्यक्तींनी वारंवार गावात भेद निर्माण करून जनतेच्या भावनांशी राजकीय खेळ खेळण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु आता वनकुटेकरांनी जागृत होऊन काम करणाऱ्या लोकांना ओळखून त्यांना ठाम साथ द्यावी. लोकशाही व्यवस्थेत कर्तव्य पार पाडणाऱ्यांनाच अधिकार गाजविण्याचा नैतिक अधिकार आहे, असेही त्यांनी यावेळी नमूद केले. यावेळी उद्योजक पोपट चौधरी, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुका कार्याध्यक्ष सुभाष सासवडे,भाजप जिल्हा सरचिटणी, सरपंच सुमनताई रांधवण, चेअरमन गणेश मुसळे, उपसरपंच बाजीराव काळनर, माजी चेअरमन काशिनाथ बुचूडे, आप्पासाहेब गागरे, भानुदास गागरे, डॉ. नितिन रांधवण, नारायण पाटील गागरे,स सुभाष दुधाडे, बी.टी.खामकर, भिमराज मुसळे, रामदास शेलार, ग्रामपंचायत सदस्य पोपट मेंगाळ, भास्कर पठारे, भास्कर शिंदे, भाऊसाहेब साळवे यांसह भिवा केसकर, ज्ञानेश्वर गागरे, कारभारी मुसळे, भिमराज मुसळे, अशोक पाटील गागरे यांसह स्थानिक पदाधिकारी, नागरीक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुढे बोलताना आमदार दाते यांनी सांगितले की, स्थानिक पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी मागणी केलेली कामे प्राधान्यक्रमाने पूर्ण केली जातीलच पण गावातील आदिवासी बहुल लोकसंख्या पाहता यापुढील काळात आदिवासी सुधार योजना, तांडा सुधार योजना, पुनर्वसनातील नागरिकांसाठी विशेष योजना तसेच सर्वसामान्य नागरिकांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रभावीपणे प्रयत्न केले जातील. या भूमिपूजनांमुळे वनकुटे गावाच्या विकासाचा नवा टप्पा सुरू होणार असल्याचा विश्वाससही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

जि.प. शाळेतील दोन नवीन वर्ग खोल्या बांधकाम करणे - २४ लक्ष, बिरोबा मंदिर रस्ता कॉंक्रीटीकरण करणे - १० लक्ष, स्मशानभूमी सुशोभीकरण करणे - १० लक्ष, हनुमान नगर (केसकर वस्ती) येथे सौर पथदिवे बसविणे - १० लक्ष, डॉ. बाबासाहेब वस्ती रस्ता कॉंक्रीटीकरण करणे - ५ लक्ष, चरपटीनाथ मंदिर परिसर पेव्हर ब्लॉक बसविणे - १० लक्ष, गोसावीबाबा मंदिर परिसर पेव्हर ब्लॉक बसविणे - १० लक्ष, महादेव मंदिर परिसर पेव्हर ब्लॉक बसविणे - १० लक्ष अशा एकुण ८९ लक्ष रुपयांच्या कामांचा शुभारंभ यावेळी करण्यात आला.

# प्रस्थापितांना धक्का, मजुरांना सुट्टी, आणि प्रचाराला ओव्हरटाईम"

**किनवट : (समर्थ गांवकरी)**

किनवट नगर परिषद निवडणुकीने यंदा प्रस्थापितांच्या खुर्च्यांखालील पायच जणू काढून घेतले आहेत. अनेक ठिकाणी 'नवख्या' उमेदवारांना संधी मिळाल्याने निवडणूक चित्रपटाच्या क्लायमॅक्सप्रमाणे रंगत चढली आहे. आयत्यावेळी महायुतीचे घटक पक्ष एकत्र आल्याने अनेक राजकीय पंडितांचा 'जातीय गणित' चा हिशेब कोलमडून पडला आहे. विशेष म्हणजे दोन्ही मुख्य ध्रुव—महाविकास आघाडी आणि महायुती—यांच्याकडून उभ्या असलेल्या महिला उमेदवार एकाच धर्माच्या असल्याने, नेहमीचा 'धर्माचा रंग' वापरण्याची संधी मोठ्या पक्षांना गमवावी लागली आहे. त्यामुळे यंदा निवडणूक सरळ "जात-धर्म सोडून विचारधारा" या फॉर्म्युल्यावर आली आहे, हेही नवेच! दरम्यान, सर्वच मोठे पक्ष ५ ते ११ जागांसाठी तळ ठोकून बसले असले, तरी प्रत्यक्षात कोणालाच ५ जागांचा टप्पा पार करणे शक्य दिसत नाही. अशा परिस्थितीत २ ते ३ अपक्ष उमेदवार निवडून येतील, अशी दाट शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त होत आहे. म्हणजे 'मोठ्यांचा खेल बाजूला, आणि अपक्षांचा मेळा पुढे' असे चित्र हळूहळू स्पष्ट होत आहे.

# खडकी गावाची प्रतिष्ठा धोक्यात; अवैध मटका-जुगार अड्डे बंद करण्याची ग्रामस्थांची जाहीर मागणी

■ ग्रामपंचायत सदस्य पुंजाराम खांडवी यांचा ग्रामसेवकांकडे अर्ज सादर

**कळवण तालुका : (समर्थ गांवकरी)**

खडकी गावात गेल्या काही महिन्यांपासून उघडपणे सुरू असलेल्या अवैध मटका पिढी आणि जुगार व्यवसायामुळे गावकऱ्यांचा संताप उसळला आहे. तरुण पिढीचे आयुष्य या वाईट व्यसनांच्या गर्तेत अडकताना पाहून ग्रामस्थ केवळ चिंतेत नाहीत तर अस्वस्थ आहेत. गावातील



शांतता, संस्कार आणि प्रतिष्ठेला डाग लावणाऱ्या या बेकायदेशीर व्यवसायांवर तात्काळ बंदी आणावी, अशी जोरदार मागणी ग्रामपंचायत सदस्य पुंजाराम पंडीत खांडवी यांनी केली आहे.

या संदर्भातील अर्ज त्यांनी ग्रामसेवक आणि सरपंच यांना अधिकृतपणे सादर केला असून, खडकी ग्रामपंचायत प्रशासनाला आता तातडीचा निर्णय घेण्याची वेळ आली आहे. गाव बदनाम... तरुण पिढी वाट चुकतेय... ग्रामस्थ आक्रोशित

खडकीसारख्या शांत आणि प्रगतिशील गावात मटका-जुगार अड्डे खुलेआम सुरू राहिल्याने गावाचे नाव बदनाम होत असल्याची गंभीर भावना ग्रामस्थांत रुजली आहे. गावातील अनेक तरुण या जुगाराच्या व्यसनात ओढले जात आहेत. कष्टाची कमाई काही क्षणांत वाया जात असल्याने कुटुंबांमध्ये संघर्ष निर्माण होत आहेत. समाजव्यवस्था ढासळत असल्याचे चित्र स्पष्टपणे दिसत असून, या व्यवसायामागे "कोणाचा तरी छुपा आशीर्वाद आहे का?" असा सवालही ग्रामस्थ विचारू लागले आहेत.

# पिरामल फायनान्स महाराष्ट्रात विस्तार , FY28 पर्यंत देशभरात एकूण ₹1.5 लाख कोटी AUM साध्य करण्याचे लक्ष्य

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**





पिरामल फायनान्स लिमिटेडने आज महाराष्ट्रभर मोठ्या विस्ताराची घोषणा केली असून आर्थिक वर्ष 2028 पर्यंत एकूण 1.5 लाख कोटी रुपये AUM गाठण्याचे चे लक्ष्य ठेवले आहे. महाराष्ट्र पिरामल फायनान्ससाठी सर्वात मोठ्या बाजारपेठांपैकी एक असून नाशिक, नागपूर, पुणे आणि कोल्हापूरसह राज्यातील प्रमुख शहरांमध्ये 77 शाखांच्या मदतीने 1,21,000 हून अधिक ग्राहकांना सेवा पुरवली जाते. राज्यात गृहकर्जे आणि बिझनेस लोन्ससाठी विशेषतः मोठी मागणी दिसून येत आहे.

कंपनीने आपल्या प्रमुख मोहिमेच्या पुढील टप्प्याचे अनावरणही केले 'हम काग़ज़ से ज़्यादा नीयत देखते हैं, ज्यामध्ये भारतभरातील कुटुंबे आणि लहान उद्योजकांच्या आकांक्षा अधोरेखित करणारी तीन नवीन फिल्म्स समाविष्ट आहेत.

पिरामल फायनान्सचे रिटेल एयूएम 75,000 कोटी रुपयांपेक्षा जास्त झाले असून चार वर्षांत साडेतीन पट वाढ नोंदवली आहे. कंपनीचे आर्थिक वर्ष 2026 च्या अखेरीस 1,00,000 कोटी रुपयांचे उद्दीष्ट आहे. उत्सव काळात रिटेल वितरणात 45 टक्क्यांची वाढ झाली, जी गृहकर्ज, वैयक्तिक आणि व्यवसाय कर्जासाठी उपनगरी बाजारातून मिळालेल्या मागणीमुळे झाली आहे. आर्थिक वर्ष 2026 च्या पहिल्या सहामाहीत 32 टक्के वाढ नोंदवली गेली. कंपनी डिजिटल सोल्यूशन्स आणि वैयक्तिक सेवांचा समन्वय साधणाऱ्या आपल्या "हाय टेक अँड हाय टच" मॉडेलच्या माध्यमातून विस्तार सुरू ठेवत आहे.

जगदीप मल्लारेड्डी, सीईओ – रिटेल लेंडिंग, पिरामल फायनान्स यांनी सांगितले,"सशक्त आणि वेगाने विस्तारत असलेल्या रिटेल फ्रँचायझीसह देशातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या एनबीएफसी पैकी एक म्हणून, महाराष्ट्रासारख्या बाजारपेठांमध्ये मोठी संधी आम्हाला दिसते. उपनगरी आणि उदयोन्मुख बाजारपेठा आमची वाढ वेगाने पुढे नेत आहेत, आणि आमचे लक्ष साधे, पारदर्शक आणि विश्वासार्ह क्रेडिट सोल्युशन्स देण्यावर आहे, विशेषतः अशा ग्राहकांना ज्यांच्याकडे नेहमीच पारंपरिक दस्तावेज नसतात.

आमचे हाय-टेक, हाय-टच मॉडेल आम्हाला ग्राहकांच्या वास्तविक गरजांशी जोडले ठेवते आणि जबाबदारीने वाढ साध्य करत दीर्घकालीन विश्वास निर्माण करते." सुनित मदान,सीओओ,पिरामल फायनान्स म्हणाले,"महाराष्ट्र आमच्या सर्वात महत्त्वाच्या बाजारपेठांपैकी एक आहे आणि आम्ही ग्राहकांना अधिक सातत्यपूर्ण आणि सुसंगत सेवा देण्यासाठी आमची ऑपरेशनल क्षमता मजबूत करत आहोत. आधुनिक तंत्रज्ञान, सुधारित प्रक्रिया आणि प्रदेशकेंद्रित उत्पादन डिझाईनमध्ये गुंतवणूक करून आम्ही घरगुती ग्राहक आणि लहान व्यवसायांना जलद प्रक्रिया, उत्तम सेवा आणि त्यांच्या गरजेनुसार योग्य वित्तीय समाधान देण्याचा प्रयत्न करत आहोत.

# ठोस सामाजिक कार्य केल्याशिवाय कोणताही गौरव स्वीकारणार नाही

## खा. नीलेश लंके यांचा निर्धार : स्वातंत्र्यसेनानी सेनापती बापट स्मृती पुरस्कारांचे वितरण

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**



जोपर्यंत मी एखादे ठोस सामाजिक कार्य पूर्ण करत नाही, तोपर्यंत कोणताही सन्मान स्वीकारणार नाही अशी ठाम भूमिका खासदार नीलेश लंके यांनी व्यक्त केली.सोशल पारनेर सामाजिक संस्था व कृषी व जनसेवा प्रतिष्ठानतर्फे देण्यात आलेल्या स्वातंत्र्यसेनानी सेनापती बापट स्मृती पुरस्कारांचे वितरण खासदार लंके यांच्या हस्ते झाले यावेळी ते बोलत होते.ज्येष्ठ साहित्यिक साहेबराव ठाणगे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.नवनिर्वाचित नगराध्यक्षा डॉ.विद्या कवरे, उपनगराध्यक्षा सुप्रिया शिंदे यांचा यावेळी नागरी सत्कार करण्यात आला.

डॉ.रफीक सय्यद (आरोग्य व अध्यात्मिक कार्य),पारनेर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रंगनाथ आहेर (शिक्षण, संस्कृती व पर्यावरण),पारनेर तालुका पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष संजय वाघमारे (पत्रकारिता, लेखन व सामाजिक चळवळ), पत्रकार देवीदास आबूज(पत्रकारिता व साहित्य),प्रसाद तारे (शिवचरित्रकार), प्रकाश गाजरे (आदर्श गाव), मार्तंड बुचूडे (पत्रकारिता),अलका कदम (महिला सक्षमीकरण),गणपत वाफारे (समाजसेवा), राजेंद्र देशपांडे (समाजसेवा),अनिल भंडारी (समाजसेवा) यांना यांना स्वातंत्र्यसेनानी सेनापती बापट स्मृती पुरस्काराने गौरवण्यात आले.

शिक्षक नेते रा.या.औटी, ज्येष्ठ विधीज्ञ पी.आर.कावरे, मारूती शेरकर, सोशल पारनेरचे अर्जून भालेकर,कृषी व जनविकास प्रतिष्ठानचे अरूण आंधळे,नंदकुमार दरेकर,विठ्ठल औटी, दिलीप भालेकर, संजय देशमुख, सुधाकर दरेकर,गौरव भालेकर,बिंदूराज भालेकर वसिम राजे,साहिल शेख आदी उपस्थित होते.

खासदार लंके म्हणाले की, सेनापती बापटांच्या पुण्यतिथीदिनी त्यांच्या जन्मस्थळावर त्यांना अभिवादन करणे म्हणजे क्रांतींची,समाजसेवेची प्रेरणा, उर्जा घेण्यासारखे आहे. सेनापतींच्या पुण्यतिथीचे औचित्य साधत सोशल पारनेर,कृषी व जनविकास प्रतिष्ठानने पारनेर तालुक्यातील विविध क्षेत्रात भरीव योगदान देणाऱ्या व्यक्तींचा सन्मान केला ही पारनेरकरांच्या दृष्टीने अभिमानाची बाब आहे. यातील एकाही पुरस्कार्थींच्या कामाबाबत शंका उपस्थित केली जाऊ शकत नाही असा विश्वास खासदार लंके यांनी व्यक्त केला.

ज्येष्ठ साहित्यिक साहेबराव ठाणगे म्हणाले की,आपापल्या क्षेत्रात काम करणाऱ्या माणसाला पुरस्कार मिळाला किंवा पाठीवर थाप पडली तरी ती खूप महत्वाची असते. त्यामुळे आणखी जोमाने काम करण्यास ऊर्जा मिळते.

तरुण पिढीस या पुढील काळात नोकऱ्या मिळणार नाहीत त्यासाठी त्यांनी स्वतःचे उद्योगधंदे सुरु करावेत.असे आवाहन ठाणगे यांनी केले. कार्यक्रमाचे संयोजक अर्जुन भालेकर व अरुण आंधळे म्हणाले की,सेनापती बापटांच्या विचारांना व समाजसेवेची प्रेरणा देणाऱ्यांना प्रकाशात आणणे हा पुरस्काराचा हेतू आहे. अर्जून भालेकर यांनी प्रास्ताविक केले.प्रा.अशोक शिंदे यांनी सूत्रसंचालन केले तर अरूण आंधळे यांनी आभार मानले.

# श्रीदत्त साधकाश्रम देवस्थानला ब वर्ग दर्जा देणार



**चांदा : (समर्थ गांवकरी)**

नेवासा तालुक्यातील चांदा येथील श्रीदत्त साधकाश्रम देवस्थानचा समावेश क वर्गातून ब वर्गात करण्यासाठी प्रयत्न करणारा असून या देवस्थानसाठी लागणारा निधी तातडीने उपलब्ध करून देण्याचे आश्वासन शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनी केले आहे . चांदा येथील श्रीदत्त साधकाश्रमात चालू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह व श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याला खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनी काल भेट दिली. या ठिकाणी अकरा दिवस वैकुंठवासी गुरुवर्य ह भ प रोहिदासजी महाराज चांदेकर यांच्या तृतीय पुण्यस्मरण व भगवान श्रीदत्तात्रेयाच्या जयंती उत्सवाच्या निमित्ताने भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा, किर्तन महोत्सव, ज्ञानेश्वरी पारायण असे विविध कार्यक्रम पार पडत आहेत. सध्या श्रीदत्त साधकाश्रम क वर्ग वर्गात आहे. मात्र क वर्ग देवस्थान निधीतून मिळणारा निधी हा या देवस्थानच्या विस्तारासाठी कमी पडत असल्याने देवस्थान ब वर्गात समावेश करावा . चांदा ग्रामस्थांच्या वतीने अशी मागणी खासदार वाकचौरे यांच्याकडे केली होती. त्यानुसार त्यांनी प्रत्यक्ष भेट देऊन श्रीदत्तसाधक आश्रम देवस्थानचा ब वर्ग समावेश करण्यासंदर्भात प्रयत्न करणार असून येथील विविध सुखसुविधाच्या कामासाठी तातडीने दहा लाखाचा निधीही मंजूर करत असल्याचे यावेळी जाहीर केले .

त्यामुळे आता श्रीदत्त साधकाश्रम देवस्थानचा ब वर्ग देवस्थानात समावेश झाल्यास या ठिकाणी भाविकांसाठी आणखी सुख सुविधा उपलब्ध करण्याच्या दृष्टीने देवस्थान प्रयत्न करणार असून या ठिकाणी भाविकांसाठी विविध प्रकारच्या सुख सुविधा उपलब्ध करणार असल्याचे देवस्थानचे अध्यक्ष प्रकाश भालके व त्यांच्या कमिटीच्या वतीने खासदार वाकचौरे यांना आश्वासित करण्यात आले . उपस्थित पाहुण्यांचा स्वागत व सन्मान देवस्थानच्या वतीने अध्यक्ष प्रकाश भालके यांनी केले . यावेळी ह भ .प राजेश आनंद कुऱ्हे महाराज, ह.भ. प. वेताळ महाराज , हभप संजय महाराज दहातोंडे, संस्थांचे अध्यक्ष प्रकाश भालके, राजेंद्र लाटे, ठेकेदार गणेश गव्हाणे , बाबासाहेब कुसेकर चांदा व परिसरातील रस्तापूर ,मांडेगव्हाण, मोरगव्हाण, देडगाव , देवगाव पंचक्रोशीतील भाविक यावेळी उपस्थित होते.




मंचर : मंचर ता.आंबेगाव येथील महात्मा गांधी विद्यालयामध्ये समाजसुधारक व शिक्षणतज्ज्ञ महात्मा ज्योतिबा फुले यांचा स्मृतिदिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य नितिन बाणखेले होते.उपमुख्याध्यापक महेंद्र कारंडे, पर्यवेक्षक दिलीप बच्चे आणि दशरथ काळे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. प्रणाली निघोट व आराध्या थोरात या विद्यार्थीनींनी महात्मा फुले यांच्या कार्यावर आधारित प्रभावी भाषणे करत समाजातील अंधश्रद्धा, शिक्षणाचा प्रसार, स्त्री-शिक्षण इत्यादी विषयांवर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे नियोजन विजय शेळकंदे, निलिमा चव्हाण, माधुरी गिते, दत्तात्रय चासकर तसेच शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी केले.

## थोडक्यात बातम्या...

### सुभेदार मेजर रावजी घुले यांचे निधन



संगमनेर (स. गांवकरी) : तालुक्यातील सारोळे पठार येथील माजी सैनिक रावजी भागुजी घुले उर्फ मेजर यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांनी ३५ वर्ष देशसेवा केली, भारतीय सैन्यात नोकरीच्या काळात त्यांनी सुभेदार मेजर ऑरनरी कॅप्टन या पदी कर्तव्य बजावले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुले मुलगी, सुना, भाऊ, भावजई, पुतण्या, पुतणी असा मोठा परिवार आहे. चांगदेव घुले यांचे ते बंधू तर संगमनेर शहरातील उद्योजक सचिन व नितीन घुले यांचे ते वडील होते. त्यांच्या अंत्यविधी समयी राजकीय, सामाजिक आदिसह सर्वच क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### आगर खोरे महाबरेवाडी मार्गे मातीचे डंपर अंधारात वाहतूक मोठ्या प्रमाणात

शिवनेरी (स. गांवकरी) : आगर खोरे महाबरेवाडी मार्गे मातीचे डंपर अंधारात रात्रीच्या वेळी वाहतूक मोठ्या प्रमाणात सुरू आहे. याबाबत संबंधित जुन्नर पोलीस स्टेशन व तहसील कार्यालय महसूल विभाग याबाबत कठोर काय निर्णय घेणार याकडे तालुक्याचे लक्ष लागलेले आहे. शासनाचा अधिकारी पाठीशी असल्यामुळेच अंधाराचा फायदा घेऊन माती महाबरेवाडी मार्गे मोठ्या प्रमाणात वाहतूक सुरू आहे का?. किंवा शासनाच्या नजरेआड वाहतूक सुरू आहे का ?अशी चर्चा तालुक्यात सुरू आहे . सर्वसामान्य शेतकरी बांधवांना माती पाहिजे असेल तर तहसील कार्यालय महसूल विभाग नियमाच्या अटी हा डोंगर उभा करत आहे. त्यामुळे शेतकरी दुखावला आहे. रात्रीच्या अंधारात माती वाहतूक करण्यापेक्षा दिवसा वाहतूक व्हावी अशी नागरिकांमध्ये चर्चा सुरू आहे . माती वाहतूक माती करणारे यांनी दिवसा वाहतूक का करत नाही ?. तहसीलदार डॉ. सुनील शेळके काय निर्णय घेतात याकडे तालुक्याचे लक्ष लागलेले आहे . या मार्गे सातत्याने वाळू व माती रात्रीच्या वेळेस सातत्याने डंपर वाहतूक मोठ्या प्रमाणात सुरू आहे . या मार्गावरून मोठ्या प्रमाणात वाहतूक पुढे कुठे जाते याकडे चर्चेला उधाण सुरू आहे .शासनाचा अधिकारी पाठीशी असल्यामुळेच अंधाराचा फायदा घेऊन माती महाबरेवाडी मार्गे मोठ्या प्रमाणात वाहतूक सुरू आहे का?. किंवा शासनाच्या नजरेआड वाहतूक सुरू आहे का ?अशी चर्चा तालुक्यात सुरू आहे . सर्वसामान्य शेतकरी बांधवांना माती पाहिजे असेल तर तहसील कार्यालय महसूल विभाग कागदोपत्री नियमाच्या अटी चा डोंगर उभा आहे. त्यामुळे शेतकरी याबाबत दुखावला आहे.

### निवडणूक आली की विकासाच्या गप्पा मारणाऱ्या दोन्ही आमदारांना धडा शिकवा

जामखेड तालुका (स. गांवकरी) : भाजप व राष्ट्रवादीच्या दोन्ही आमदारांची दोन टर्म झाली आहे पण शहराला आठ दिवसाआड पाणी, रस्त्याचे अर्धवट कामे व धुळीने माखलेले शहर, औद्योगिक वसाहतीला खोडा व श्रेयवादाची लढाई करायची अशी परस्थिती असताना निवडणूक आली की दोन्ही आमदार तळ ठोकून बसतात व विकासाच्या गप्पा मारतात राष्ट्रवादी काँग्रेसच्या सर्वसामान्य कुटुंबातील उमेदवारांना विजयी करून त्या दोघांना धडा शिकवा असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार) स्टार प्रचारक सुनिल आण्णा शेळके यांनी नगरपरिषद निवडणुकीच्या शुक्रवारी झालेल्या जाहीर सभेत केले. जामखेड नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस उमेदवारांच्या प्रचारार्थ झालेल्या जाहीर सभेत स्टार प्रचारक सुनिल आण्णा शेळके बोलत होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष महेश निमोणकर, प्रदेश युवती अध्यक्ष संध्या सोनवणे, राष्ट्रवादी तालुकाउपाध्यक्ष बापूराव शिंदे, युवा नेते अक्षय शिंदे, कर्जत तालुकाध्यक्ष बाळासाहेब शिंदे, सुरज रसाळ, नगराध्यक्ष उमेदवार सुवर्णा निमोणकर, नगरसेवक पदाचे उमेदवार सारिका डोळे, सुरज निमोणकर, द्वारका पवार, पूजा शिंदे, नजमा सय्यद, मिठूलाल नवलाखा, गणेश काळे, मुक्ता म्हेत्रे, शेख सलाउद्दीन, ताहेरा शेख, महेश निमोणकर आदी उपस्थित होते.यावेळी बोलताना आ. सुनिल आण्णा शेळके म्हणाले, नगरपरिषद निवडणुकीसाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधानपरिषदेचे सभापती प्रा राम शिंदे,आ.रोहीत पवार यांनी सभा घेऊन राष्ट्रवादी काँग्रेसच्या एक सर्वसामान्य कुटुंबातील व्यक्ती महेश निमोणकर यांना घेरण्याचे काम करत आहेत. पण आ. सुनिल शेळके तुमचा भाऊ म्हणून तुमच्या पाठीशी भक्कम पणे उभा आहे. मला ही मावळमध्ये असेच घेरले होते व सर्व सत्ता त्यांच्या बाजुने होती पण माझ्या माघे उपमुख्यमंत्री अजितदादा दुरदृष्टी असलेले नेते आहेत. तुम्ही त्यांना निवडून द्या अजितदादा या शहराचा चेहरामोहरा बदलून टाकतील.

### खासगी आस्थापनांना पोश कायद्याची काटेकोर अंमलबजावणी करावी

मुंबई (स. गांवकरी) : महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी सर्व सरकारी विभाग, निमशासकीय संस्था तसेच खासगी आस्थापनांनी प्रिव्हेशन ऑफ सेक्शुअल हॅरेसमेंट ॲक्ट कायद्याची काटेकोर अंमलबजावणी करणे बंधनकारक आहे. यासाठी सर्व आस्थापनांनी अंतर्गत समिती तातडीने गठीत करण्याचे आवाहन महिला व बालविकास आयुक्त नयना गुंडे यांनी केले आहे. ज्या कार्यालये किंवा आस्थापनांमध्ये 10 किंवा त्याहून अधिक कर्मचारी कार्यरत आहेत, त्यांनी अंतर्गत समिती स्थापन करणे बंधनकारक असल्याचे स्पष्ट केले आहे. राज्यातील शासकीय, निमशासकीय कार्यालये, महामंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय कंपनी, नगरपरिषद, तसेच शासन अथवा स्थानिक प्राधिकरणाकडून निधी प्राप्त करणाऱ्या सर्व संस्थांमध्ये अंतर्गत समिती स्थापन करावी लागणार आहे. त्याचप्रमाणे खासगी कंपन्या, उद्योग, सेवा पुरवठादार संस्था, शैक्षणिक संस्था, रुग्णालये, मनोरंजन क्षेत्रातील संस्था, क्रीडा संघटना, क्रीडा संकुले आदी सर्व खासगी आस्थापनांनाही हा नियम लागू आहे.

# दोन सत्ताधारी पक्षातच लढाईची गर्जना भाजपा; शिवसेना जोमात तर काँग्रेस कोमात ?

**मुखेड : (समर्थ गांवकरी)**







मुखेड येथील नगर परिषदेच्या निवडणूकीत आता रंग भरला असून राज्यात सत्ताधारी असलेल्या भाजपा-शिवसेना शिंदे गटातच प्रमुख लढत होत असून सर्व ताकदिनीशी लढू म्हणणारी काँग्रेस मात्र कोमात ?अल्याचे दिसून येत आहे. राज्यात महाआघाडी म्हणून असणा-या शिवसेना उबाठा,राष्ट्रवादी कॉंगेस(शरद पवार गट),शेकाप व वंचितला कॉंगेसने वा-यावर सोडले असून या पक्षातील कार्यकर्त्यांना शिवसेना शिंदे गटाचा आसरा घ्यावा लागला आहे. भाजपा व शिवसेना शिंदे गट सर्व ताकदिनीशी लढत असून नगराध्यक्षासह सर्व नगरसेवकांना निवडूण आणण्यासाठी आ.डॉ. तुषार राठोड व बंधू माजी नगरसेवक गंगाधर राठोड हे बंधूद्वय पहाटेपासूनच मतदारसंघ पिंजून काढत आहेत. ही निवडणूक माजी आ.कर्मवीर किशनराव राठोड व दलितमित्र गोविंदराव राठोड यांच्या पश्चात होत आहे. मुखेडची जनता कोणाच्या पदरात मताचे दान टाकते हे ३ तारखेला स्पष्ट होणार आहे. आ.डॉ.तुषार राठोड यांनी भाजपाकडून नगराध्यक्ष पदासाठी आपले विश्वासू कार्यकर्ते व वैश्य समाजासह सर्व समाजातील गरजूंच्या मदतीला धावून जाणारे राम सावकार पत्तेवार यांच्या सौभाग्यवती विजया राम पत्तेवार यांना उमेदवारी दिली आहे.पत्तेवार घराण्याला राजकीय वारसा नसला तरी कै.गोविंदमामा पत्तेवार यांच्या रुपाने धार्मिक वारसा लाभला आहे. पक्षासह सर्व पत्तेवार फॅमिली व पाहुणेमंडळी प्रचारात दिसून येत आहेत. शिवसेना शिंदे गटाकडून माजी नगराध्यक्ष बाबु सावकार देबडवार यांच्या भावजय विजया धोंडुराम देबडवार या उभ्या आहेत. आपल्या आईला निवडूण आणण्यासाठी डॉ.अतुल सावकार देबडवार हे सर्वतोपरी प्रयत्न करत आहेत.त्यांनी मुखेडच्या विकासासाठी मत मागीतले आहे. शिवसेना शिंदे गटाचे नेते खा.डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या प्रचार सभेनंतर कार्यकर्त्यात जोश निर्माण झाला आहे. विधानसभेला पराभूत झालेले अपक्ष उमेदवार बालाजी पाटील खतगांवकर यांच्या आधारावर उभ्या असलेल्या शिवसेना शिंदे गटाच्या टिमला पाठबळ देणे गरजेचे दिसून येते. कॉंग्रेसकडून उच्चशिक्षित उमेदवार डॉ.दिपाली श्रावण रॅपनवाड या आपले नशिब अजमावत आहेत.त्या कॉंग्रेसचे प्रदेश सरचिटणीस डॉ.श्रावण रॅपनवाड यांच्या पत्नी आहेत. डॉ.श्रावण रॅपनवाड यांचा प्रवास भाजपापासून सुरु झाला असला तरी ते आज कॉंग्रेस पक्षात वरिष्ठ पदावर आहेत.शहरातील विविध प्रश्न घेवून ते आजपर्यंत लढत आले आहेत.सर्वसामान्यांचा नेता म्हणून ते परिचित असले तरी त्यांना स्थानिक पक्षनेतृत्वाने वा-यावर सोडल्याचे दिसून येते. मुखेड नगर पालिका निवडणूकीत २० उमेदवार उभे करावयाचे असताना सुध्दा राष्ट्रीय स्तरावर काम करणा-या कॉंग्रेस पक्षाला सर्व ठिकाणी उमेदवार उभे करता आले नाहीत, कॉंग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांना दुस-या पक्षाकडून उमेदवारी घेवून उभे टाकण्याची नामुष्की ओढवली आहे.

## मैत्रीला जपणारा माणूस म्हणजे विशाल राऊत : बंधू चव्हाण

**चिपळूण : (समर्थ गांवकरी)**

चिपळुण नगरपरिषद निवडणूक २०२५ या निवडणुकीसाठी माझे मित्र श्री. विशाल विजया विलास राऊत चिन्ह घड्याळ हे प्रभाग क्र. १ (ब) मधून उमेदवार म्हणून उभे आहेत. सार्वजनिक क्षेत्रात ज्या पद्धतीने आपल्या चिपळूणचे आमदार श्री. शेखरजी निकम सर काम करत आहेत त्यांच्या त्या कामाच्या ख्यातीने आमदार साहेबांची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढत आहे. त्याच आमदार शेखर सरांनी निवडलेला हा उमेदवार खरोखरच लोकांच्या कामाचा माणूस गोवळकोटकरांच्या विकासासाठी हा माणूस स्वतःला झोकुन देईल. मी गोवळकोटच्या सर्व जनतेला आवाहन करतो, एकदा मत रुपी आशीर्वाद श्री. विशाल राऊत यांना द्यावेत आणि आपल्यातलाच आपला माणूस नगरपरिषदेवर पाठवावा. आमदार श्री. शेखर निकम सरांच्या शब्दाला आणि तुमच्या मत रुपी आशीर्वादाला माझे मित्र श्री. विशाल राऊत कधीही तडा जाऊ देणार नाहीत याची मला खात्री आहे. इतर मुलांप्रमाणे खेळणं, धावणं, मस्ती करणं हे सगळं होतंच... परंतु विशालच्या मनात मात्र लहानपणापासून एक गोष्ट घट्ट होती ती म्हणजे "आपण ज्या समाजात राहतो त्या समाजाचं आपण काहितरी देणं लागतो."

## रोहित राऊत ठरले भारताचे पहिले आय- पॉपस्टार

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**




सहा अविस्मरणीय आठवडे आणि तब्बल 85 ओरिजनल ट्रॅक्सनंतर देशभरात नव्या, स्वतंत्र पॉप आवाजांची लाट आणणाऱ्या ॲमेझॉन एमक्स प्लेयरवरील आय-पॉपस्टारच्या पहिल्या सीझनची सांगता झाली. भारतातील म्युझिक रिअलिटी शोजमधे नवा मापदंड प्रस्थापित करणाऱ्या या शो ची सांगता एका दिमाखदार अंतिम फेरीसह करण्यात आली. प्रेक्षकांचा अभूतपूर्व प्रतिसाद, सोशल मीडियावर गाजणारी नवी गाणी आणि एका रात्रीत स्टार बनणारे आर्टिस्ट यांच्यासह झालेल्या या अंतिम फेरीत अस्सल कला आणि भारतीय पॉप संगीताचा पुनर्जन्म साजरा करण्यात आला.

अंतिम फेरीची सुरुवात स्पर्धकांनी स्टेजवर जबरदस्त परफॉर्मन्स सादर करत झाली. प्रत्येकाच्या आवाजातून भारताच्या या सर्वात मोठ्या स्टेजवर त्यांचा प्रवास उलगडला. चरण पथानिया यांनी कॉन्सर्ट- स्टाइलमधे आपला परफॉर्मन्स सादर करत अंतिम फेरीची दमदार सुरुवात केली. यावेळी गायिका राधिका भिडे यांनी आपला परफॉर्मन्स सादर करण्यापूर्वी मुनावर फारूकी यांनी त्यांची अनोखी ओळख करून दिली तो क्षण सर्वांसाठीच हृदयस्पर्शी होता. त्यानंतर राधिका यांनी सर्वांसमोर, विशेषतः रत्नागिरीवरून आलेल्या आपल्या कुटुंबासमोर गायन सादर केलं. त्यानंतर मुनावर यांनी आपली एका नर्मविनोदी स्टँडअपमधून सर्वांचा मूड बदलला आणि त्याचवेळेस प्रिन्स नरूला खास पाहुणे म्हणून मेंटॉर्समधे सहभागी झाले. त्यांनी या शोला मिळत असलेल्या लोकप्रियतेचं भरभरून कौतुक केलं आणि आपल्या मुलीचा आय- पॉपस्टारमधल्या गाण्यांवर ताल धरत असतानाचा व्हिडिओही दाखवला. अंतिम स्पर्धकांनी त्यांचं सादरीकरण पूर्ण केल्यानंतर संपूर्ण भारत ज्या क्षणाची वाट पाहात होता, त्या क्षणासाठी स्टेज सज्ज करण्यात आलं.

# केईएम हॉस्पिटल पुणे तर्फे फीटल मेडिसिन विषयावर राष्ट्रीय परिषद आयोजित

### फीटल मेडिसिन क्षेत्रात भविष्यात एआयची भूमिका महत्त्वाची

**पुणे : (समर्थ गांवकरी)**




केईएम हॉस्पिटल पुणे तर्फे फीटल मेडिसिन विषयावर राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले. यामध्ये प्रसूतीपूर्व निदान, गर्भावस्थेदरम्यान उपचार आणि एक विशेष उदयोन्मुख शाखेच्या रूपात फीटल मेडिसिनचे वाढते महत्त्व यावर विविध तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. परिषदेमध्ये विविध तज्ज्ञांनी लवकर निदान आणि उपचाराचे माता व बाळांवर होणाऱ्या परिणामांविषयी आपली भूमिका मांडली. गर्भवाढीदरम्यान उद्भवणाऱ्या विविध समस्या,जन्मजात विसंगती,अनुवंशिक विकार आणि प्लासेंटा (गर्भ वेष्टन) च्या कार्यात बिघाड अशा अनेक स्थितींचे निदान लवकर केले जाऊ शकते व त्यावर लक्षित उपचार करत काही बाबतीत जन्माआधी जीवनदायी प्रक्रिया (फीटल प्रोसिजर्स) केले जाऊ शकतात.या राष्ट्रीय परिषदेमध्ये फीटल मेडिसिनमधील प्रख्यात तज्ज्ञ डॉ.मणिकंदन कृष्णन, मेडिस्कॅन सिस्टिम्स डायग्नोस्टिक अल्ट्रासाऊंड,फीटल मेडिसिन अँन्ड ट्रेनिंग सेंटर,चेन्नई चे संचालक प्रा. डॉ.सुरेश सेषाद्री, प्रख्यात फीटल मेडिसिन तज्ज्ञ डॉ.एस.सुदर्शन, केईएम हॉस्पिटल पुणे च्या फीटल मेडिसिन विभागाचे प्रमुख डॉ.श्रीपाद कऱ्हाडे यांसह अनेक तज्ज्ञांनी आपले सादरीकरण करत मार्गदर्शन केले. या परिषदेला स्त्रीरोग तज्ज्ञ, रेडिओलॉजिस्ट व फीटल मेडिसिन तज्ज्ञ मोठ्या संख्येने उपस्थित होते.


यानिमित्त आयोजित पत्रकार परिषदेत फीटल मेडिसिनमधील प्रख्यात तज्ज्ञ डॉ.मणिकंदन कृष्णन, प्रख्यात फीटल मेडिसिन तज्ज्ञ डॉ.एस.सुदर्शन, केईएम हॉस्पिटल पुणे चे वैद्यकीय संचालक डॉ.झक्सेस कोयाजी, केईएम हॉस्पिटल पुणे च्या फीटल मेडिसिन विभागाचे प्रमुख डॉ.श्रीपाद कऱ्हाडे आणि फीटल मेडिसिन तज्ज्ञ डॉ.श्वेता गुगले यांनी या विषयावर माहिती दिली.

फीटल मेडिसिनमधील प्रख्यात तज्ज्ञ डॉ.मणिकंदन कृष्णन म्हणाले की,फीटल मेडिसिनचा उद्देश प्रतिबंध,असामान्यतांचे निदान,उपचार आणि जोडप्यांना असलेल्या अनेक शंकांचे निरसन करत पाठबळ देणे हे आहे.

प्रख्यात फीटल मेडिसिन तज्ज्ञ डॉ.एस.सुदर्शन म्हणाले की,सर्वांत मोठे आव्हान हे आहे की,अनेक जोडपे पुढील टप्प्यात येतात. चांगले परिणाम मिळण्यासाठी गर्भधारणापूर्वी सल्ला घेणे महत्त्वाचे आहे, यात जेनेटिक काउन्सिलिंगचा देखील समावेश असू शकतो.

# जिल्हास्तरीय शालेय हाफ किडो बॉक्सिंग स्पर्धा उत्साहात संपन्न

**श्रीगोंदा तालुका (समर्थ गांवकरी)**



जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय अहिल्यानगर, श्रीगोंदा तालुका क्रीडा समिती व महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालय, श्रीगोंदा यांच्या संयुक्त विद्यमाने दि. 28 नोव्हेंबर 2025 रोजी जिल्हास्तरीय शालेय हाफ किडो बॉक्सिंग स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत जिल्ह्यातील विविध शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांतील खेळाडूंनी मोठ्या उत्साहात सहभाग नोंदवला.

स्पर्धेचे उद्घाटन महाविद्यालयाचे सन्माननीय प्राचार्य डॉ. महादेव जरे यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले शब्बीर पठाण यांनी किडो बॉक्सिंग या खेळाचे महत्त्व विशद करून विद्यार्थ्यांनी शारीरिक तंदुरुस्ती व आत्मसंरक्षणासाठी या खेळात मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे, असे आवाहन केले.

आपल्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. महादेव जरे यांनी किडो बॉक्सिंग या खेळाचा उगम, त्याचा विकास व आंतरराष्ट्रीय पातळीवरील महत्त्व याविषयी माहिती दिली. तसेच भविष्यात श्रीगोंद्यात विभागीय व राज्यस्तरीय स्पर्धांचे आयोजन करण्यासाठी महाविद्यालयाकडून सर्वतोपरी सहकार्य देण्याचे आश्वासनही त्यांनी यावेळी दिले आणि सर्व खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक तालुका क्रीडा समितीचे अध्यक्ष जामदार सर यांनी केले. याप्रसंगी समितीचे उपाध्यक्ष रोहन रंधवे, मा. समीर पांढरकर, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. प्रकाश साळवे, डॉ. सुदाम भुजबळ, पर्यवेक्षक प्रा. रत्नाकर झिटे, जिमखाना प्रमुख प्रा. रमेश थोरात, प्रा. श्रीकांत थोरात, प्रा. ढवळे सर तसेच ज्युनिअर व सीनियर कॉलेजचा संपूर्ण शिक्षकवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होता. स्पर्धेचे सूत्रसंचालन प्रा. संदीप दरेकर यांनी केले तर डॉ. प्रकाश साळवे यांनी आभार प्रदर्शन केले. संपूर्ण स्पर्धा अत्यंत खेळीमेळीच्या व शिस्तबद्ध वातावरणात पार पडली.

या स्पर्धेत जिल्ह्यातील विविध शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांतील खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी केली. महाराजा कॉलेजच्या खेळाडूंनी घवघवीत यश संपादन केले.

राम दरेकर, प्रथमेश होले व आकांक्षा येरकळ यांची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. तसेच साहिल चव्हाण, अनिकेत आटोळे, स्नेहल फंड, वैष्णवी दरेकर, वैष्णवी बोरुडे व प्रतीक्षा उदमले यांनी आपापल्या वजनगटात द्वितीय क्रमांक पटकावला. या यशस्वी खेळाडूंना क्रीडा शिक्षक प्रा. संजय डफळ व क्रीडा संचालिका कल्पना बागुल यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या जिल्हास्तरीय स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांमध्ये खेळाविषयीची आवड वाढण्यास चालना मिळाली असून भविष्यात किडो बॉक्सिंगसारख्या खेळामध्ये श्रीगोंदा तालुका नव्या उंचीवर जाईल, असा विश्वास यावेळी सर्व मान्यवरांनी व्यक्त केला.